

घटक 1
वीर विश्वासाचे
रविवार शाळा
WOW!
शिक्षक पुस्तक
सर्व वयोगटांसाठी

# विश्वासाचे वीर

**"मुले महत्वपूर्ण आहेत" यांच्या द्वारे रविवार शाळा अभ्यासक्रम**

**शिक्षक पुस्तक**

**सर्व वयोगटांसाठी**

**घटक 1: धडे 1-13**

**वेब:**

**www.ChildrenAreImportant.com/heroes/**

¡संपूर्ण "मुले महत्वपूर्ण आहेत" टीमचे धन्यवाद!

मुख्य संपादक: क्रिस्टीना क्रॉस
क्रिएटिव्ह टीम: अ‍ॅबिल पालासीस कॅमाचो, ड्वाइट क्रॉस, जेनिफर संचेझ निएतो, ज्युलियो सांचेझ निएटो, माइक कांगस, मोन्सराट डुरान डीआझ, सुकी कांगस, वेरोनिका तोज आणि विकी कांगस.
या कार्यक्रमातील अद्भुत संगीताबद्दल रूबेन डारियो ह्यांचे धन्यवाद.
अनुवाद कार्यसंघ:
अली अतुहा, ऍलाइन जावियर, अनुपमा वानखेडे, अरोमा पब्लिकेशन्स, ब्लेसी जेकब, कार्ला मायुमी, क्रिसब्रेस्हन, डेव्हिड राजू, एफ्राइम नुनुगुन मिरोबी, फिनकी जेकब, गेनाव, जेकब कुरुविला, क्रुझ 1, मार्कोस रोचा, मॅथ्यू दास, नसीम बोगेटिया, पॉल म्वांगी, पॉल सेप्टन, रुबिना राय, सबरीना बेनी जॉन आणि उपशीर्षकण्.

# प्रस्तावना

**विश्वासाचे** वीर रविवार शाळेमध्ये आपले स्वागत आहे! अभ्यासाच्या हया श्रृंखलेत आपण इब्री 11 मध्ये असणा-या विश्वास वीरांबद्दल पाहणार आहोत. आपल्या शारीरिक जीवनापेक्षा आपले आत्मिक जीवन आधिक महत्वाचे असल्यामूळे आपण हे शिकणार आहोत कि आपण विश्वासाचे जीवन कसे जगू शकतो. आपण हे देखील तपासू कि आपल्या दैनंदिन जीवनातील साधारण निर्णयापेक्षा आत्मिक निर्णय महत्वाचे आहेत. नंतर आपण ज्या स्त्री पुरूषांशी देव बोलला, आणि जे त्याच्यासाठी जगले त्यांच्या जीवनाचे परिक्षण केल्या नंतर हया प्रश्नांचे उत्तर देउ. ते आपल्यासाठी उदाहरण आहेत. कधी कधी आपण लोकांनी केलेल्या चांगल्या गोष्टी पाहतो आणि इतर वेळेस आपण त्यांच्या चूकांकडून शिकू शकतो.

जरी आपण हे वर्ग लहान मुलांसाठी आणि किशोर वयाच्या मुलांसाठी शिकवित आहोत तरी त्यांच्या बरोबर जुन्या करारातील काही गंमतीचे पैलू शिकण्यात तुम्ही सुंदरता प्राप्त कराल. सर्वात महत्वाचे म्हणजे आपल्या दैनंदिन जीवनात हया मूल्यांचे लागूकरण करण्याच्या नविन कल्पना पाहणे उत्तम आहे. हे साहित्य लिहितांना आम्ही देवाबद्दल आणि ख्रिस्ती जीवनाबद्दल शिकण्याचा आनंद प्राप्त केला.

आपण विश्वासाच्या बाबतीत बोलत आहोत म्हणून त्याची परिभाषा करून सुरवात करू या. ज्या मुख्य वचनाचा आपण उपयोग करणार आहोत ते आहे इब्री 11:1 ‘विश्वास हा अपेक्षित गोष्टींविषयींचा भरवसा आणि न दिसाणा-या गोष्टींची खातरी असा आहे.’ देवावर विश्वास ठेवणे म्हणजे तो दिसत नसतांनाही तो अस्तित्वात आहे असा विश्वास ठेवणे. हा विश्वास देवा कडून येतो सामान्यतः पवित्र शास्त्रा मधून. आणि त्या विश्वासाने, आपण त्याच्यावर व त्याच्या अभिवचनांवर विश्वास ठेवू शकतो. आणि त्याला जे हवे ते करू शकतो- देवाची इच्छा पाळणे.

सर्व ख्रिस्ती व्यक्तिंसाठी पवित्र शास्त्र खूप महत्वाचे पुस्तक आहे, परंतू ते मोठे पुस्तक आहे. आपल्यातील सर्वांनी पवित्र शास्त्र पूर्ण वाचले नाही. ते इतके मोठे किंवा विशाल आहे कि आपण शिक्षकही हरवू शकतो, ज्या गोष्टी घडल्या त्या कधी व कुठे घडल्या हे न समजल्यामूळे त्याबद्दल गोंधळू शकतो. कल्पना करा कि मुलांना कसे वाटत असेल! आपल्याला हयासाठी मदत करण्यासाठी आपण जुन्याकराराचे आणि नंतर इब्री 11 मधील गोष्टींचे पुनरावलोकन करणार आहोत. आपण हे शिकू आणि नंतर त्याला आपल्या आध्यात्मिक जीवनाचा भाग बनवू. मुलं जुन्या करारातील पुस्तकांचे नावं पाठ करतील आणि काही महत्वाच्या घटना ऐतिहासिक क्रमाने ठेवल्या जातील जेणे करून ते तारीख व घटना हया बद्दल कमी गोंधळतील.

जुन्या कराराचा अभ्यास करणे महत्वाचे आहे हयाचे मुख्य कारण हे कि आपण विस्मयकारक गोष्टी आणि सूचना पाहू शकतो हया आपल्या आजच्या जीवनाला लागू होतात. देवाने आपल्याला त्याचे वचन दिले आहे, जेणे करून आपण आपल्या रोजच्या जीवनात देवाची व इतरांची सेवा करत वीर किंवा नायक बनू शकतो.

तुमचे प्राथमिक उद्दीष्ट, जर तुम्ही त्याचा स्वीकार करण्याचे निवडिले तर, हे आहे कि मुलं, आणि किशोरवयीन मुलांसाठी, घरी, वर्गात, आणि मंडळीत प्रत्येक धडा तुमच्या जीवनात एक उदाहरण म्हणून लागू करावा. जरी तुमचे विद्यार्थी पवित्र शास्त्रामधून गोष्टी पाठ करतील तरी मुख्य उद्दीष्ट हे आहे कि जे ते दर आठवडयात शिकतील ते जगणे.

तुमचे उद्दीष्ट हे आहे कि हे धडे ते त्यांच्या दैनंदिन जीवनात कसे लागू करतील हयावर लक्ष केंद्रित करणे. आम्हाला तुमचे उत्तर आत्ताच हवे आहे. ही टीप 10 सेकंदात स्वतःला नष्ट करेल. 'विश्वासाचे वीर' हया अभ्यासाच्या सभोवती तुम्ही मुलांचे आणि किशोरवयीन मुलांचे मार्गदर्शन करत असतांना देव तुमचे जीवन आर्शीवादित करो.

प्रेमळपणे,

मुलं महत्वाचे आहे सर्जनशील संघ



# हया साहित्याचा उपयोग कसा करावा

## कथा/ ठराव आश्यक आहे

*“एक महान शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान देणारा नसतो, परंतू तो त्या ज्ञानात त्यांची आवड जागृत करतो आणि त्यांना स्वतःसाठी त्याचा पाठपुरावा करण्यासाठी उत्सुक करतो.’- एम जे बेरील.*

तुमच्या मुलांना केवळ वर्गात लक्ष देण्यासाठी नव्हे तर वर्गात जे शिकविले जाते ते त्यांच्या जीवनात लागू करण्यासाठी त्यांना प्रेरणा देणे आश्धयक आहे. अनेक जण मिठाई आणि बक्षीसं देउन किंवा जर त्यांनी लक्ष दिले नाही तर त्यांना शिक्षा करून मुलांना प्रेरणा देण्याचा प्रयत्न करतात. जरी हया दोन्ही पद्वती तुम्हाला वर्गात चांगले वर्तन देतील तरी ते त्यांना शिकविलेल्या तत्वांचे पालन करण्यासाठी प्रेरित करू शकत नाही. ख्रिस्ती मंडळी मध्ये मुलांचे शिक्षक हया नात्याने आपण त्यांना केवळ प्रौढांच्या सभे मध्ये त्यांनी व्यत्यय आणू नये म्हणून त्यांना गुंतवून ठेवत नाही तर आपण नविन विश्वासणा-यांची पिढी वाढविण्याचा प्रयत्न करीत आहोत जी देवाचे अनुकरण करते, त्याला ओळखते आणि त्याची सेवा करते. जरी हे आपल्यापैकी प्रत्येकासाठी कठिण काम असले तरी, आश्र्चयाची गोष्ट म्हणजे देवाला प्रत्येक मुलाची काळजी आहे आणि तो आपल्याला पूढे चलत राहण्यासाठी आणि प्रत्येक मुलाच्या जीवनात प्रेरणा देण्यासठी आणि त्याची सेवा करण्यासाठी त्याची शक्ति देतो.

**वेळापत्रक**

**उघडा:**
- स्वागत आहे
- कथा आवश्यक आहे
- गाणे

मुख्य पाठ
क्रयिकलाप (पर्यायी)
आवश्यक कथा संकल्प

**विद्यार्थी पुस्तके**
- टाइमलाइन
- क्रयिकलाप पृष्ठ

प्रश्न आणि उत्तरे (जुन्या विद्यार्थ्यांना)
गेम (पर्यायी)
उपस्थिती
असाइनमेंट

तुमच्या मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही प्रत्येक धडयाच्या सुरवातीला ‘आवश्यकतेची गोष्ट’ पूरविली आहे, त्यांना देवासाठी त्यांची गरज अनुभवण्यासाठी आणि जे काही ते शिकत आहेत ते घरी त्यांच्या ख-या जीवनात लागू करण्यास मदत करण्यासाठी. प्रत्येक गोष्टी मध्ये आम्ही तयार केलेले पाच पैकी एक काल्पनिक पात्र असेल. त्याचे नाव बदलण्यास मोकळी असू दया. एक कल्पना अशी आहे कि दर आठवडी स्वयंसेवकांना त्या गोष्टीचा अभिनय करण्यास सांगणे. जर ते व्यवहारिक नसेल तर, तुम्ही ती गोष्ट फक्त वाचून दाखवू शकता. तुम्ही मुलांना ती समस्या सोडविण्यासाठी कल्पना किंवा विचार विचारू शकता. त्यांच्या कल्पना वाईट, चांगल्या, चूक किंवा बरोबर आहेत असे



त्यांना सांगू नका आणि सध्या त्यांना काही उपाय सांगू नका. न सोडविलेल्या तणावाचा उपयोग मुलांना धडयात लक्ष देण्यासाठी प्रवृत्त करण्यासाठी वापरा.

निर्णय भाग धडयाच्या शेवटी येतो. जर मुलं खूप वेळ बसलेले असतील तर निर्णय भागाच्या आधी सुध्दा एखादी कृती करा. जेव्हा तयारी होईल तेव्हा मुलांना आवश्यक गोष्ट आठवण करून द्या आणि मग तुमच्या कलाकारांना त्यांच्या पात्रातुन बाहेर यायला सांगा किंवा फक्त ते सांगा. हया मुळे आवश्यक गोष्टींतील तणाव कमी करण्यास मदत होईल आणि मुलं शाळेत किंवा घरी ज्या समस्यांचा सामना करतील त्यासाठी त्यांना मदत होईल. अशा प्रकारे, तुम्ही मुलांना त्यांच्या दैनंदिन जीवनात हया धडयांचे लागूकरण करण्यासाठी प्रवृत्त कराल.


## मुख्य धडा

हा अभ्यासक्रम जुन्या कराराचे एक अवलोकन आहे. अनेक धडयांमध्ये, तुम्ही पवित्र शास्त्रातील व्यक्तिच्या किंवा वीराच्या संपूर्ण जीवनाकडे पाहणार आहात. शिक्षक हया नात्याने तुम्ही हा अभ्याक्रम स्वतः अभ्यासासाठी वापरू शकता आणि दिलेले शास्त्रपाठ आधिच वाचा व नवीन अंर्तदृष्टी देखील प्राप्त करा. प्रत्येक वीराच्या जीवनाचा सारांश धडयामध्ये समाविष्ट आहे. मुलांना उत्सुक ठेवण्यासाठी त्यांना विचारा कि त्यांना त्या वीराच्या जीवनाबद्दल अधिक काही आठवतं का.

कृपया गोष्टीचा भाग लहान ठेवा, म्हणजे तुम्हाला मुख्य मुद्दा सांगण्यासाठी वेळ मिळेलः लागुकरण. प्रत्येक धडयाच्या शेवटी मुलांसाठी एक निर्णय असेल. पूर्ण धडयाचा हा मुख्य मुद्दा असेल, जसा फुटबॉल बॉल गेम मध्ये गोल करणे. जर तुम्ही खेळ नीट खेळले, आणि संघातील इतर खेळाडूंना बॉल दिला आणि विरोधी संघातील खेळाडूं पासून जर तो सुरक्षित ठेवला, परंतू तुम्ही गोल केलाच नाही तर तुम्ही कधीच जिंकत नाही. खात्री करा की तुम्ही मुख्य लागूकरणापर्यंत पोहचाल जेणे करून मुलांना त्यांच्या जीवनात ते लागू करण्यासाठी मदत मिळेल. याकोब 1:22-24 मध्ये आपण वाचतो कि, 'वचना प्रमाणे आचारण करणारे असा केवळ ऐकणारे असू नका अशाने तुम्ही स्वतःची फसवणूक करता, कारण जो कोणी वचन नुसते ऐकून त्याप्रमाणे कृति करीत नाही तर तो आरशांत आपले शारीरिक मुख पाहणा-या मनुष्यासारखा आहे. तो स्वतःला पाहून तेथून जातो आणि आपण कसे होतो हे तेव्हाच विसरतो.' 1 करिंथ 10 मध्ये आपण जुन्या करारातील गोष्टी वचतो ज्या आपल्यासाठी उदाहरण आहेत कि आपण काय करावे आणि काय करू नये. जुन्या वीरांकडे पाहणे म्हणजे स्वतःला आरश्यात पाहण्यासारखे आहे, जे आपल्याला त्यांच्या जीवनातून शिकण्याची संधी देते. आपल्या मुलांना त्यांचे अनुकरण करणे शिकवू या आणि त्यांच्या चुकांकडून शिकून देवासाठी जगणे शिकवू.

## काल रेखा

देर आठवडी मुलं त्यांच्या पुस्तकात पवित्र शास्त्रातील वीराच्या जीवनाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी कालरेखेवर एक रेष काढतील. उदाहरणार्थ धडा 1 मध्ये, ते आदामाचे जीवन 1 म्हणून चिन्हांकित करतील. कल्पना हि आहे कि दिलेल्या संख्येचा वापर करून मुलं काल रेखेवर अंदाज लावतील कि ती कुठुन सुरू व्हावी आणि कुठे संपावी. प्रत्येक चैकोन 100 वर्ष दर्शवितो. उदा. आदामाचे जीवन निर्मीतीच्या सहाव्या दिवसापासून सुरू होते आणि 930 वर्षी संपते, किंवा कालरेषेवर 9 आणि 1/3 चैकोन. प्रत्येक वीराचे जीवन व आश्चर्यकारक तपशील पाहणे मनोरंजक असेल. जसे कि आदामापासून नोहाच्या मृत्यूचा काळ हा आब्राहमापासून येशूपर्यंतच्या काळा एवढा होता!





## कार्य

मुलांना त्यांनी शिकलेले धडे जीवनात उतरविण्यासाठी आणखी एक साधन म्हणजे प्रत्येक आठवडयात दिला गेलेला गृहपाठ. प्रत्येक धडयात अशी क्रिया असते जे मुले आठवडयाच्या मध्ये करू शकतात.

योहान 14:23 मध्ये येशूने म्हटले, *"जर कोणी माझ्यावर प्रीति करतो तर तो माझी शिकवण पाळील, माझा पिता त्याच्चावर प्रीति करील. आम्ही त्याच्याकडे येऊ व त्याच्याबरोबर राहू."*

हया कृती किंवा गृहपाठामूळे मुलं त्यांच्या जीवनात देवाला आठवडया दरम्यान आणू शकतात केवळ चर्च मध्येच नव्हे. मोठया मुलांसाठी पवित्र शास्त्रामधून वाचनाची कृती आहे. गृहपाठ कृतीची चर्चा करण्यासाठी वर्गात काही वेळ घ्या आणि त्यांना सराव करण्यासाठी वर्गात संधी दया. ज्या मुलांनी कार्य पूर्ण केले त्यांना लहानसे बक्षीस किंवा चाकलेट दया.

## हजेरी/वीर खेळ





हया सामग्री बरोबर उपस्थित राहिल्या बद्दल बक्षीस देण्यासाठी कार्डांचा एक संच सुध्दा आहे. परंतू तो एक खेळ सुध्दा होवू शकतो! घटकाच्या शेवटी ... 13 धडे, किंवा 3 महिने, मुलं कार्डांचा वार करून खेळ खेळू शकतात. अधिक माहितीसाठी खेळ सूचना वाचा.

**पर्यायी खेळ:**




मुलांना कागदाच्या तुकडयावर 1-10 आकडे लिहायला सांगा. नंतर शिक्षक खेळाच्या सूचनांमध्ये दिलेले कोणतेही 10 प्रश्न विचारतील. कोष्ठकामध्ये दिलेले गुणविशेष सांगू नका. प्रत्येक प्रश्नासाठी, त्या परिस्थितीत कोणत्या गुणविशेषाची गरज आहे हे विद्यार्थी लिहितील.: सामर्थ्य, सत्यता, आज्ञाधारकपणा, नम्रता, हृदय किंवा विश्वास. ज्यानी सर्वात अचूक अंदाज लावला तो चाकलेट किंवा बक्षीस जिंकतो.

# 1. देवावर विश्वास ठेवा



**पवित्र शास्त्रातील गोष्ट: निर्मिती**

उत्पत्ति 1:1-2:3, इब्री 11:1-3

## पाठांतर वचन 1

इब्री लोकांस पत्र 11:1 “विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टींविषयीचा भरवसा आणि न दिसणाऱ्या गोष्टींबद्दलची खातरी आहे.”

## आवश्यकतेची गोष्ट 1



रविवार शाळेत त्यांनी बझला निर्मिती बद्दल शिकविले, त्यांनी त्याला सांगितले कि देवाने संपूर्ण जग दहा दिवसात निर्माण केले. नंतर काही दिवसांनी शाळेत शिक्षकांनी त्यांना जीवशास्त्राचे पुस्तक काढायला लावले आणि आपण माकडांपासून निर्माण झालो ही उत्क्रांतीची कल्पना दाखविली. हया मुळे बझवर मोठा प्रभाव पडला. तो म्हणाला, ‘ चर्चमध्ये मला एक गोष्ट शिकवितात आणि शाळेत वेगळी.

## मुख्य धडा 1

विश्वासाचे वीर हया मध्ये आपले स्वागत आहे, हा एक नवीन रवीवार शाळा अभ्यासक्रम आहे जेथे आपण इब्री 11 च्या दृष्टिकोनातून जुन्या कराराचा अभ्यास करणार आहोत, जिथे पौल विश्वासाच्या वीरांची यादी देत आहे. जुन्या कराराच्या हया अभ्यासामये आपण पाहू कि वेगवेगळे व्यवसाय असलेले अनेक लोक होते. त्यात शेतकरी, माता, पाळक, स्वयंपाकी, राजे आणि सेवकही होते. परंतू आपण त्या प्रत्येकाच्या जीवनात पाहणार आहोत कि त्यांनी जे आत्मिक निर्णय घेतले ते त्यांच्या भौतिक किंवा शारीरिक जीवना पेक्षा किंवा त्यांच्या नोकरी पेक्षा अधिक महत्वाचे होते. तुम्हाला माहित आहे का कि तुम्ही मोठे झाल्यावर काय बनणार आहात? तुम्हाला अग्नीशमक, डॉक्टर, इंजिनियर, पाळक, शिक्षक किंवा मेकॅनिक बनायचे आहे का? जेव्हा आपण आपल्या जीवनाबद्दल विचार करतो तेव्हा आपण आपल्या कामाबद्दल विचार करतो किंवा समाजात आपला हुद्दा किंवा स्थान हया बद्दल. परंतू हया गोष्टी देवासाठी आपल्या हृदयापेक्षा आणि आपल्या त्याच्या बरोबरच्या संबंधांपेक्षा अधिक महत्वाच्या नाहित. देवाकडे तुमच्या जीवनासाठी विशेष योजना आहे!

आजच्या पवित्र शास्त्रातील गोष्टीमध्ये आपण निर्मीती बद्दल शिकणार आहोत, तो आठवडा ज्यात देवाने शब्दाद्वारे सृष्टी निर्माण केली. पवित्र शास्त्र सांगते कि विश्वासाने आपल्याला कळते कि देवाच्या आज्ञेने विश्वाची निर्मीती झाली. म्हणून जे काही दिसते ते जे दृष्य त्याच्या पासून निर्माण झाले नाही. (इब्री 11:3) उत्पत्ति 1 आणि 2 मध्ये सांगितल्या प्रमाणे देवाने सहा दिवसात सृष्टी निर्माण केली.

दिवस 1: रात्र आणि दिवस

दिवस 2: आकाश आणि समुद्र

दिवस 3: जमीन आणि वनस्पती

दिवस 4: तारे, सूर्य आणि चंद्र

दिवस 5: समुद्रातील प्राणी आणि पक्षी

दिवस 6: जमीन प्राणी आणि मानव

पवित्र शास्त्र आपल्याला जगाच्या सुरवातीच्या देवाचाा वृत्तांत सांगते, आणि त्याने ते कसे निर्माण केले हे सांगते. त्याने आपली पृथ्वी व विश्व सहा दिवसात तयार केली आणि आदाम आणि हवेला पहिले मानव म्हणून त्याने निर्माण केले आणि त्यांना एदेन बागेत ठेवले. 7 व्या दिवशी देवाने त्याच्या कामापासून विश्राम घेतला.

लोकांनी वेगवेगळया गोष्टींवर विश्वास ठेवला. बझ सारखं तुम्ही देखाल अशा शाळेत जात असाल जेथे तुम्ही उत्पत्ति बद्दल ऐकता आणि जग किती वर्ष जुने आहे ते ऐकता. कधी कधी लोक आपल्या अस्तित्वासाठी आणि देवावर विश्वास ठेवणे टाळावे म्हणून वेगवेगळे कारणं घेवून समोर येतात, सिध्द करण्यासाठी विज्ञानाला थोडासा पिळा देतात. ख्रिस्ती हया नात्याने आपण इतिहासा संबंधी अंधळे नाही, कारण आपण असा विश्वास ठेवतो कि आपल्याकडे पवित्र शास्त्र म्हटलेले पुस्तक आहे, जे आपल्याला जगाच्या सुरवातीचा ऐतिहासिक वृत्तांत देते.

मी देवावर विश्वास ठेवतो, मी विश्वास ठेवतो कि त्याने सृष्टी निर्माण आणि मी विश्वास ठेवतो कि पवित्र शास्त्र मला इतिहासाचा अचूक वृत्तांत देतो. देवाकडे माझया जीवनासाठी योजना आहे आणि मी त्याच्या वर विश्वास ठेवण्याची निवड करतो.

## निर्णय 1



बझ समजू शकतो कि अनेक गोष्टी आहेत ज्याच्यावर लोक विश्वास ठेवतात. उदा. लोक असा विश्वास ठेवत असत कि पृथ्वी सपाट आहे परंतू आता आपण तसे मानत नाही. आज आपण शिकत आहोत कि देवाने जग व त्यातील सर्वकाही निर्माण केले.

## कृती 1

**तुम्हाला सर्वात ज्यास्त काय आवडते?**



प्रत्येक मुलांला विचारा कि निर्मीतीच्या प्रत्येक दिवसाबद्दल त्याला काय आवडते आणि ते काय निर्माण करतील

दिवस 1 तुम्हाला काय अधिक आवडतेः प्रकाश कि अंधकार?
दिवस 2 तुम्ही माश्यासारखे पोहणार कि उडणार?
दिवस 3 तुम्हाला काय ज्यास्त आवडतं, रात्र कि दिवस?
दिवस 4 तुमचे आवडते झाड किंवा वनस्पती कोणती आहे?
दिवस 5 तुम्हाला कोणते पक्षी किंवा मासे सर्वात अधिक आवडतात?
दिवस 6 तुमचा आवडता प्राणी कोणता?
दिवस 7 तुमच्या सुट्टीच्या दिवशी तुम्ही काय करता?

## काल रेखा 1

आदामाच्या जीवनाची रेखा काढा

प्रश्नः आदामाचा जन्म केव्हा झाला? उत्तरः निर्मीतीच्या सहाव्या दिवशी

प्रश्नः आदाम किती वर्ष जगला? उत्तरः 930 वर्ष

## कोडे उत्तर 1

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | वि | श्वा | स | का | ता | ज | आ | दि |
| ज | स | म | द्र | ण | नि | रे | पु | स |
| ग | मु | 6 | र्मा | ज | र्मि | ती | रु | णा |
| ता | र | नि | दि | दे | वि | शे | ष | ऱ्या |
| भू | मी | र्मि | णी | व | श | चं | का | सू |
| उ | श | ति | द्र | का | स | मु | द्र | र्य |
| त्प | दे | र्मि | आ | प | रु | ष | न | ग |
| त्ति | प्रा | णी | ग | वा | देवा | पा | सू | न |

प्रारंभी **देवाने** **प्रकाश** निर्माण केला आणि देवाने पहिले कि तो **चांगला** आहे आणि देवाने प्रकाशाला, "दिवस," आणि **अंधाराला**, "रात्र" म्हटले. **दुसऱ्या** दिवशी देवाने **आकाश** **निर्माण** केले. तिसऱ्या **दिवशी**, देवाने जमीन **निर्माण** केली आणि जल्संचायास, "समुद्र" आणि **कोरड्या** जमिनीस, "भूमी" **म्हटले**. आणि देवाने वनस्पती; बीज देणाऱ्या **वनस्पती** आणि फळे तयार करणारी **फळझाडे** निर्माण केली. चौथ्या दिवशी देवाने **तारे**, सूर्य आणि **चंद्र** निर्माण केले. पाचव्या दिवशी देवाने समुद्रातील **प्राणी** आणि पक्षी निर्माण केले. **सहाव्या** दिवशी, देवाने **वनपशू** आणि पाळीव जनावरे निर्माण केले; देवाने मनुष्य आणि स्त्री निर्माण केले, त्याने त्यांना आशीर्वाद दिला आणि त्याने जे काही निर्माण केले होते त्यावर त्यांना **सत्ता** दिली



## कोडे उत्तर 1

1. देवाने जर आपल्याला रोबोट सारखे निर्माण केले असते तर? (कोणीच दारू प्याले नसते, सिगारेट ओढली नसती इ. परंतू त्यामूळे आपला आनंद मेला असता. आपण गुलामासारखे असतो, स्वतंत्र नसतो).

2. तुम्हाला भविष्यात देवाची सेवा कशी करायची आहे? (मुलांना हया समस्येवर चर्चा करण्यासाठी प्रोत्साहित करा. लक्षात ठेवा कि देव प्रत्येकाला वेगवेगळे दानं देतो आणि खिस्ताच्या शरीरामध्ये हात डोळयापेक्षा आणि डोळा हाता पेक्षा महत्वाचा नाही.)

3. तुमच्या जीवनातील सर्वात महत्वाचे निर्णय कोणते आहेत? (आत्मिक निर्णय, देवाचे आज्ञापालन, कोणशी विवाह करावा हे, आणि लहान गोष्टीमध्ये सुध्दा देवाची आज्ञा पाळणे इ)

4. मानव कोणापासून आले, माकड, एक स्फोट कि देवापासून? (योग्य उत्तरा पर्यंत पाहेचण्याआधी चर्चा प्रोत्सिाहित करा.)

## खेळ 1

**Beanbag**



लहान भागामध्ये तोडलेल्या वचनासह मोठे पोस्टर तयार करा. हया खेळात मुलं वचन बोलण्याचा सराव करतील.

- शिक्षक एका मुलाकडे बीन बॅग फेकून खेळ सुरू करतात. मुलाने उठून उभे राहावे आणि वचनाचा पहिला भाग मोठयाने बोलावा.
- हया मुलाने वचनाचा त्याचा भाग बोलल्यावर दुस-या मुलाकडे पिश्वी फेकावी तो ती झेलून वचनाचा पुढचा भाग बोलेल.
- मुलगा किंवा मुलगी खेळातून तेव्हा बाद होतो जेव्हा, जर:
    - o वचनाचा भाग पटकण बोलत नाही
    - o उभा राहत नाही
    - o मोठयाने वाक्य बोलत नाही (खूप हळू बोलता)
    - o किंवा आधिच्या मुलाचाच भाग बोलतो.

- प्रत्येकाची पाळी झाली कि तुम्ही खेळ पुन्हा खेळू शकता हया वेळेस अधिक जलद गतीने.

## हजेरी 1




वर्गात हजर राहण्यासाठी मुलांना त्यांचे आजचे कार्ड द्या. त्यांचे अभिनंदन करा आणि त्यांना दुसरे कार्ड घेण्यासाठी पुढील आठवड्यात येणास प्रोत्साहित करा जेणेकरून ते वीर खेळ खेळू शकतील! आजचे कार्ड आहे:

**निर्मिती**

## गृहपाठ 1

**कार्य**

हया आठवडी तुमचे कार्य हे असेले कि देवाने निर्मीतीच्या आठवडयात जे काही केले त्याची सेल्फी घेणे किंवा त्याचे साधे चित्र काढणे

सोमवारः सेल्फी/चित्र दिवसा किंवा रात्री
मंगळवारः सेल्फी/चित्र आकाश दाखविणारे आणि दुसरे शक्य असल्यास समुद्र, तलाव किंवा नदी दाखविणारे
बुधवारः सेल्फी/चित्र झाडं व वनस्पती दाखविणारे
गुरूवारः सेल्फी/चित्र सूर्य आणि दुसरे चंद्र किंवा तारे दाखविणारे
शुक्रवारः सेल्फी/चित्र मासे आणि शक्य असल्यास एखादा पक्षी दाखविणारे
शनिवारः सेल्फी/चित्र प्राणी व लोकांचे
रविवारः तुमच्या गृहपाठापासून सुट्टी घ्या.

**वाचा**

दिवस 1: उत्पत्ति 3:1-10
दिवस 2: उत्पत्ति 3:11-19
दिवस 3: उत्पत्ति 3:20- 4:2
दिवस 4: उत्पत्ति 4:3-16
दिवस 5: उत्पत्ति 4:17-26

# 2. त्याला तुमचे हृदय द्या



**वीर: हाबेल**

उत्पत्ति 4:1-16, इब्री 11:4

## पाठांतर वचन 2

मार्क 12: “आणि ‘तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर संपूर्ण मनाने, संपूर्ण जिवाने, संपूर्ण बुद्धीने व संपूर्ण शक्तीने प्रीती कर.”

## आवश्यकतेची गोष्ट 2



शनिवारी सकाळची वेळ होती, कौमेट चे वडील त्याच्या बेडरूम मध्ये आले व त्याला त्यांनी झोपेतून उठविले आणि म्हणाले,‘ बेटा, कृपाकरून माझी गाडी धू. मला थोडया वेळाने जायचे आहे आणि आता ती धुण्यासाठी माझयाकडे वेळ नाही. कौमेट उठला आणि त्याने त्याचा गृहपाठ करणे सुरू केले, त्याने त्याच्या घराचे आंगण स्वच्छ केले, कचरा काढला. त्याने त्याच्या वडीलांनी जे सांगितले त्याच्या शिवाय बाकी सर्व काही केले कारण त्याला वडीलांनी जे सांगितले ते करण्याची इच्छा नव्हती.  हे सर्व केल्यावर तो दुकानात गेला आणि त्याच्या वडीलांसाठी त्याने एक बक्षीस आणले. जेव्हा त्याचे वडील परत आले तेव्हा तो त्यांना दारात भेटला आणि त्याने आणलेले बक्षीस त्याने त्यांना दिले. त्याच्या वडीलांनी त्याला अलिंगण दिले नाही किंवा त्याचे आभार देखील मानले नाही, कारण त्यांनी जे सांगितले ते त्यांच्या मुलाने केले नाही हयाबद्दल त्यांना वाईट वाटत होते.

## मुख्य धडा 2

विश्वासाचे वीर’ हयात आपले स्वागत आहे!  काल आपण देवावर कसा विश्वास ठेवावा हे शिकलो. आपल्याला असे जीवन जगायचे आहे जे दाखविते कि आपण देवावर विश्वास ठेवतो. आज आपण दोन भावांबद्दल पाहणार आहोत ज्यांनी देवावर त्यांचा विश्वास दाखविण्यासाठी काही तरी केले, परंतू एकाने देवाला खूष केले आणि एक देवाला खूष करू शकला नाही.

उत्पत्ति 4 मध्ये आपण पाहतो कि आदाम आणि हवेला दोन मुलं होते, काईन शेतकरी झाला आणि हाबेल मेंढपाळ झाला द्द दोघांनीही त्यांच्या व्यवसायातून देवासाठी बक्षीस आणले. काईनाने शेतातील पिक आणले, परंतू हाबेलाने त्याच्या कळपातील प्रथम जन्मलेले पुष्ट वासरू आणले. जेव्हा त्यांनी पाहिले कि देवाला हाबेलाचे अर्पण आवडले परंतू काईनाचे आवडले नाही तेव्हा काईन हाबेलावर खूप रागाविला. देवाने त्याला इशारा दिला, परंतू देवाचे ऐकण्याऐवजी काईनाने हाबेलाला जीवे मारले!!! देवाने भावाचा वध केल्याबद्दल काईनाला शिक्षा दिली, आणि त्याला त्याच्या कुटुंबापासून दूर हाकलले व त्याला पिडा दिली.

कधी कधी आपण देवाच्या मागे जातो आणि आपण देवाला संतोष देण्याएवजी केवळ नियम पाळण्याकडे लक्ष देतो. अगदी त्या रितीने जसे आधीच्या गोष्टीत कौमेट ने केले, आम्ही देवाला संतोषविण्यासाठी सर्व काही करतो केवळ एक गोष्ट सोडून जी त्याला सर्वात ज्यास्त हवी आहे. आपण वाईट शब्द न बोलण्याबद्दल किंवा सिगोरट न पिण्याबद्दल सतर्क असतो आणि आपण दर आठवडयात चर्चला जाण्याबद्दल काळजी घेतो परंतू काधी कधी आपण हे हया साठी करतो कि दुसरे ख्रिस्ती आपल्या बद्दल काय विचार करतील हयामूळे. येशूने म्हटले कि आपण एकमेकांकडून प्रशंसा स्वीकारतो तेव्हा आपण देवाला संतोषविण्याचा प्रयत्न करत नाही (योहान 5:44) जेव्हा देवाने काईन जे कारण्याची योजना करत होता त्यासाठी त्याचा सामना केला तेव्हा तो देवाला संतोषविण्यासाठी त्याचे वर्तन बदलू शकत होता. परंतू त्या ऐवजी, काईनाने त्याच्या भाववर देवाची मर्जी असणे हयाचा ज्यास्त विचार केला. त्याने देवाऐवजी त्याची सन्मान आणि त्याचा दुखावलेला गर्व हयाची ज्यास्त पर्वा केली.

मार्क 12:30 मध्ये देवा आपल्याला त्याच्यावर पूर्ण मनाने, पूर्ण जीवनाने व पूर्ण शक्तिने प्रिती करावयास सांगतो (निर्गम 6:5, लूक 10:27 सुध्दा) हाबेलाने त्याचे हृदय देवाला दिले कारण तो देवावर तितकी प्रिती करत होता, त्याने देवाला त्याच्याकडे असलेली उत्तमातील उत्तम गोष्ट दिली. तुम्ही काईनासारखे रिकामे बक्षीस द्याल कि हाबेलासारखे देवाला तुमचे हृदय द्याल?

देवाला जे पाहिजे ते मी त्याला देवू इच्छितोः माझे हृदय!



## निर्णय 2

जेव्हा कौमेट ने पाहिले कि त्याचे वडील काहीच बोलले नाही तेव्हा तो निराश होउन त्याच्या खालीत गेला. तो रागावला कारण त्याने त्याच्या वडीलांसाठी जे काही केले त्या बद्दल तो विचार करत होता, परंतू त्याच्या वडीलांनी त्याचे आभार सुध्दा मानले नाही.

## कृती 2

**प्रेमाची पाककृती**

वर्गातील प्रत्येक मुलासाठी रेसिपी चित्राची प्रत तयार करा. मुलं ते रंगवून घरी घेउन जाउ शकतात.

2 कप दयाळूपणा

2 कप आज्ञापालन

4 चमचे एकत्रित गुणवत्ता वेळ

1 ग्लास पाणी

1 चमचा स्नेह

1 चमचा पृथ्वीचे मीठ



## काल रेखा 2

हाबेलाच्या जीवनासाठी रेष काढा.

प्रश्नः हाबेलाचा जन्म झाला तेव्हा आदाम किती वर्षाचा होता? उत्तरः नेमकी वेळ दिलेली नाही परंतू असे मानले जाते कि आदाम सुमारे 50 वर्षाचा होता.

प्रश्नः हाबेल किती वर्ष जगला? उत्तरः नेमकी वेळ दिलेली नाही परंतू असे मानले जाते कि तो 50 वर्ष जगला


## कोडे उत्तर 2

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| भा | उ | घ | डे | भ | मी | णे | प |
| न | क | प | इ | फ | दे | पा | ला |
| ह | ळ | र | स्थि | क | ळ | म | ह |
| द | हे | मे | ऊ | ती | ता | प | भू |
| बा | प | श्व | हा | सं | डे | का | भा |
| य | ला | र | बे | बा | भू | श्व | म |
| सं | ता | प | ल | ऊ | मी | य | प |
| श्व | प | स्थि | ती | णे | द | ल | भा |
| पा | का | इ | न | ह | बे | हा | ऊ |

### चूक किंवा बरोबर

बरोबर वाक्यासाठी 👍 ह्या चिन्हावर आणि चुकीच्या वाक्यासाठी 👎 ह्या चिन्हावर गोलाकार बनवा.

1. हाबेल हा आदाम आणि हवा ह्यांचा दुसरा मुलगा होता.
2. काइनाला हाबेला पेक्षा अधिक मेंढरांची काळजी घेण्याची आवड होती.
3. काइन आणि हाबेल ह्या दोघांचे अर्पण पाहून परमेश्वराला आनंद झाला.
4. काइनाला त्याच्या भावाचा राग आला आणि त्याने त्याला मारून टाकले
5. हाबेल मरण पावला हे परमेश्वराला माहित झाले नाही.



## प्रश्न उत्तर 2

1. कोणत्या परिस्थितीत देवाला फसविणे शक्य आहे? (वेगवेगळया परिस्थिती सूचविण्याचा प्रयत्न करा आणि फक्त कोणतीच नाही असे म्हणून नका जरी ते योग्य उत्तर असले तरी.)


2. सर्व चांगले लोक स्वर्गात जातील, बरोबर? (नाही. ‘चांगले असणे आपल्या स्वर्गात प्रवेश देत नाही. नव्याने जन्म घेणे आपल्याला स्वर्गात प्रवेश देतो)

3. ख्रिस्तासाठी मला मूर्ख व्हायचे आहे का? (सर्व क्षेत्रात हुशार व मूर्ख लोक आहेत जे ख्रिस्ताचे अनुयायी आहेत)

## खेळ 2


**लक्ष्य शूटिंग**

एका मोठया खर्ड्यावर मुलाचे चित्र काढा. लक्ष्य तयार करण्यासाठी रेखांकित चित्रात चिन्हांकित केलेला भाग कापा.



- कगदाचा तुकडा चोळा करून प्रत्येक मुलासाठी चेंडू तयार करा.
- त्यांना समजावून सांगा कि त्यांनी हृदयाच्या आकाराच्या जागेतून चेंडू टाकावा. शरीराच्या इतर भागात तो गेला तर तो मोजला जाणार नाही.
- जेव्हा चेंडू हृदयातून जाईल तेव्हा 1 गुण मिळेल. ज्याला सर्वात अधिक गुण मिळतील तो जिंकेल

## हजेरी 2




वर्गात हजर राहण्यासाठी मुलांना त्यांचे आजचे कार्ड द्या. त्यांचे अभिनंदन करा आणि त्यांना दुसरे कार्ड घेण्यासाठी पुढील आठवड्यात येणास प्रोत्साहित करा जेणेकरून ते वीर खेळ खेळू शकतील! आजचे कार्ड आहे:

**हाबेल**

## गृहपाठ 2

**कार्य**

हया आठवडी तुमचे कार्य हे असेल कि तुमच्या मनापासून काही तरी दया. पवित्र शास्त्र सांगतं कि आपण इतरांसाठी जे काही करतो ते आपण येशूसाठी करतो (मत्तय 25:40) म्हणून कोणालातरी मदत करण्याची संधी शोधा किंवा ज्यांना कशाची तरी गरज आहे त्यांना ते दया. तुमच्या आईवडीलांकडून परवांगी जरूर घ्या. धोकादायक अशी कोणतीच गोष्ट करू नका. तुम्हाला काही तरी परत मिळेल हया आशेने देवू नका.

**वाचा**

दिवस 1: उत्पत्ति 5:1-8

दिवस 2: उत्पत्ति 5:9-16

दिवस 3: उत्पत्ति 5:17-24

दिवस 4: उत्पत्ति 5:25-32

दिवस 5: उत्पत्ति 6:1-8

# 3. देवाला संतोषवा



**वीर: हनोख**

उत्पत्ति 5:21-24, इब्री 11:5-6

## पाठांतर वचन 3

योहान 14:23 "येशूने त्याला उत्तर दिले, "ज्याची माझ्यावर प्रीती असेल तो माझे वचन पाळील, माझा पिता त्याच्यावर प्रीती करील आणि आम्ही त्याच्याकडे येऊन त्याच्याबरोबर वस्ती करू."

## आवश्यकतेची गोष्ट 3



टॅफीच्या एका मैत्रीणीला एका समस्येबद्दल वाईट वाटले आणि ती टॅफीकडे सल्ला घेण्यासाठी गेला. ती म्हणाली, 'माझे आईवडील मला एकटीला माझया मावस बहीणीच्या शेतावर जाउ देत नाहीत, मला त्यांना देवाचे वचन सांगायचे आहे. मला समजत नाही कि त्यांच्या परवांगी शिवाय जायचे काय. मला वाटते मी निघून जावे परंतू मला कळत नाही कि देवाला कोणत्या गोष्टींनी आनंद होतो. मी काय करू? मी सोशल मिडियावर काय करावे हे विचारणार होती. मी एक चित्र पाहिले जे म्हणते जे मला योग्य वाटते ते मी करावे आणि मला माझया नातेवाईकांकडे जाणे योग्य वाटते.

## मुख्य धडा 3

विश्वासाचे वीर हया मध्ये पुन्हा एकदा आपले स्वागत आहे! आपण देवावर विश्वास ठेवणे आणि त्याला तुमचे पूर्ण हृदय देणे शिकलो. आता आपण ते थोडे पुढे नेणार आहोत. तुम्ही कधी तुमच्या शिक्षकाला, तुमच्या आई वडीलांना खूश केले का? जेव्हा कोणीतरी तुम्हाला सांगते कि तुम्ही चांगले काम केले तेव्हा आनंद होतो नाही का? तुमच्या आत चांगली भावना वाढते तो वर जो वर तुमच्या चेह-यावर हस्य येत नाही. एका माणसा बद्दल शिकूया ज्याने देवाला संतोषविले, आपणही देवाला कसा संतोष दयावा हे शिकू शकतो.

खूप खूप दिवसाआधी हनोख नावाचा एक व्यक्ति होता. त्याच्या बद्दल ज्यास्त माहिती नाही, परंतू जे आपल्याला माहित आहे ते विलक्षण चांगले आहे. 'हनोख देवाच्या समागमे राहत असे देवाने त्याला नेले आणि तो दिसेनासा झाला.' उत्पत्ति 5:24. देवाला तो इतका आवडला कि त्याने त्याला नेले! किती अद्भूत! एक दिवस आपण त्याला स्वर्गात भेटणार आहोत आणि आपण आपला सर्व वेळ एकत्र घालविणार आहोत. इब्री 11:5-6 सांगते की, 'त्याच्या विषयी साक्ष झाली की, तो देवाला संतोषवीत असे.' देवाला पाहणे त्याच्यासाठी कसे असेल हयाची तुम्ही कल्पना करू शकता का? हनोखाच्या चेह-यावर सर्वात मोठे हस्य असेल कदाचीत!

आपण देवाला हनोखासारखे संतोषवू शकतो, त्याच्या वचनावर विश्वास ठेवून आणि त्याच्या समागमे चालून. इब्री 11:6 म्हणते,‘ आणि विश्वासावचून त्याला संतोषविणे अशक्य आहे, कारण देवाजवळ जाणा-याने असा विश्वास धरिला पाहिजे की तो आहे आणि त्याजकडे धाव घेणा-याला तो प्रतिफळ देणारा होतो.’ आपण देवावर विश्वास ठेवतो आणि आपण त्याच्यावर विश्वास ठेवून व त्याच्या वचनाप्रमाणे वागून त्याला शोधतो.

या आधी आपण टॅफीच्या मैत्रीणी बद्दल ऐकले जिला काय करावे हे जाणायचे होते. पवित्र शास्त्र सांगते की आईवडीलांचा मान राखावा, म्हणून तिने तेच केले पाहिजे.

पवित्र शास्त्र आपल्यासाठी देवाचे वचन आहे. आपण विश्वास ठेवतो कि देवाचे वचन अचूक आहे (त्यात चूका नाहीत) अशा रितीने आपण ते वाचू शकतो आणि विश्वास ठेवू शकतो कि जे काही ते सांगते ते खरे आहे. एवढेच नव्हे तर, पवित्र शास्त्र हे देवाचे जिवंत वचन आहे!!

ते जिवंत कसे असू शकते?? देवाचे वचन जिवंत आणि परिणामकारक आहे (इब्री 4:12) तुम्ही कधी पवित्र शास्त्र वाचले का आणि ते शब्द पानांवरून उडी मारून बाहेर आले, त्या दिवसासाठी जे तुम्ही ऐकायला हवे होते अगदी तेच ते होते? जगभरातल्या ख्रिस्ती लोकांसोबत असे होते. योहान 1:14 म्हणते कि जेव्हा येशू ख्रिस्त आला, तेव्हा जणू काही पवित्र शस्त्र व्यक्ति बनले आणि मानव म्हणून आपल्या बरोबर चालले! जेव्हा आपण पवित्र शास्त्र वाचतो आणि त्यावर विश्वास ठेवतो, तो ते हानोखा सारखे देवाबरोबर चालण्यासारखे असते!

मला देवाला आनंद दयायचा आहे, म्हणून मी पवित्र शास्त्रावर विश्वास ठेवतो कि त्याला चूका नाहित आणि तो माझ्या ख्रिस्ती जीवनासाठी मार्गदर्शक असे आहे.

## निर्णय 3



‘पहा मैत्रीणी,’ टॅफी म्हणाली, पवित्र शास्त्रात असे म्हटले आहे कि तू तुझ्या आईवडीलांचा मान राखला पाहिजे. ते असेही सांगते कि तुम्ही तुमच्या अधिका-यांचा मान राखला पाहिजे. देवाची इच्छा जाणण्याचा उत्तम मार्ग म्हणजे मला किंवा सोशल मिडियाला न विचारता पवित्र शास्त्र वाचणे आहे. तिथे तुम्ही काय करावे हे देव तुम्हाला सांगत आहे.’

## कृती 3

**पुढा-याचे अनुकरण करा**



हया कृतीसाठी मुलं जोडीत काम करतील. पवित्र शास्त्र सांगते कि हनोख देवाबरोबर चालला आणि हे हे म्हणण्यापेक्षा वेगळे आहे कि देव हनोखा बरोबर चालला. जर तुम्हाला कोणातरी सोबत चालायचे असेल तर तुम्ही अनुसरण केले पाहिजे, ते जेव्हा पूढे जातात तेव्हा पूढे जावे आणि जेव्हा फिरतात तेव्हा फिरावे. मुलांना त्याच्या जोडीदाराचे पुढारीपण करू दया मग बदला आणि दुस-याला पुढारीपण करू दया. ओळखा कि कधी कधी हे सोपे नसते कि दुस-याचे अनुकरण करावे तुम्ही सतर्क राहून काहीही करण्यासाठी तयार असले पाहिजे.


## काल रेखा 3

हनोखासाठी रेषा काढा.

प्रश्नः हनोख जन्मला तेव्हा आदाम किती वर्षाचा होता? उत्तरः 622 वर्षाचा.

प्रश्नः हनोख किती काळ जगला? उत्तरः365 वर्ष

## कोडे उत्तर 3



| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ह | नो | वि | चा | आ | दा | मे | थु |
| आ | ख | श्वा | दा | ल | ह | नो | ख |
| दा | प्र | स | न्न | न्म | णे | ल | र |
| म | प्रा | थु | म | हो | चा | श्च | मा |
| मे | स | स | श्य | थु | मे | हो | झ्या |
| श्च | थु | द्द | कै | र | श | ख | व |
| सा | अ | श्वा | प | ले | प्र | ल | र |
| द्द | क्ष | द्द | ज | न्म | ल | स | ह |
| व | च | न | ग | हो | णे | णे | न् |
| घे | हे | आ | दा | श्य | घे | म | द्द |



## प्रश्न आणि उत्तर 3

1. देवाने पवित्र शास्त्र लिहिले हे खरे आहे का? ( देवाने लिहिले नाही, परंतू त्याने लोकांना कल्पना दिल्या आणि लेखकांनी ते लिहिले. पवित्र शास्त्र 40 लेखकांनी 1500 वर्षात लिहिले)

2. मी परिपूर्ण का नाही? (आपण जीवनाचा आनंद घ्यावा अशी देवाची इच्छा होती हया बद्दल बोला, म्हणून त्याने रोबोट तयार केले नाही. सर्व मानव चूका करतात, परंतू जो कोणी त्याचे अनुसरण करतो त्याला देव मदत करतो. स्वमूल्य आणि देवाची प्रिती आणि कृपा हया बद्दल बोला)

3. आपण देवाला कसे संतोषवू शकतो? (देवाला आपले हृदय देवून त्याच्या आज्ञा पाळून आणि त्याच्या बरोबर वेळ घालवून)

## खेळ 3

पेन्टॅटयूच रिले



पाच कागदांवर पवित्र शास्त्राच्या पहिल्या पाच पुस्तकांची नावे लिहा आणि खाली दिलेल्या चालनाचा आराखडा.

दुस-या कागदावर पेन्टॅटयूच लिहा. सुरवातीची रेष रिबीन किंवा खुर्चीने आखा आणि पेन्टॅटयूच कागद त्यांचा पोहचण्याचे स्थान आहे असे दाखवा.

पवित्र शास्त्राच्या पुस्तकांचे नाव असलेले पाच कागदं वेगवेगळया जागेवर पोहचण्याच्या जागेपासून तुमच्या जागेनुसार दुर ठेवा.

**गतिशीलता**

- उत्पति: पाय लांब करा.
- निर्गम: squats करा.
- लेवीय: उडभ् मारा.
- गणना: गोल फिरा
- अनुवाद: एका पायावर लंगडी करा.

**खेळ**

- रिले शर्यय धावण्यासाठी 2 संघ तयार करा.
- प्रत्येक संघातील खेळाडू एकाच वेळेस धावेल.
- कागदावर पोहचल्यानंतर विद्यार्थी पवित्र शास्त्रातील पुस्तकाचे नाव ओरडतो आणि दिलेली कृती करतो.
- पेन्टीटयूच मधले प्रत्येक पुस्तक संपविल्यानंतर विद्यार्थी धावतो आणि पोहचण्याच्या जागेला हात लावतो आणि मग संघाचा दुसरा खेळाडू सुरू करतो.
- ज्या पुस्तकाकडे आधीची व्यक्ति पोहचली त्याच्या पेक्षा वेगळया पुस्तकाकडे त्याने जावे.
- जो संघ सर्व पाच पुस्तकांकडे पोहचून पोहचण्याच्या ठिकाणी पोहचेल तो जिंकल.

सर्व मुलांनी पवित्र शास्त्राचे पहिले पाच पुस्तकं पाठ करे पर्यंत खेळ खेळा.

## हजेरी 3

वर्गात हजर राहण्यासाठी मुलांना त्यांचे आजचे कार्ड द्या. त्यांचे अभिनंदन कराआणि त्यांना दुसरे कार्ड घेण्यासाठी पुढील आठवड्यात येणास प्रोत्साहित करा जेणेकरून ते वीर खेळ खेळू शकतील! आजचे कार्ड आहे:




**Pentateuch**

## गृहपाठ 3

**कार्य**

हया आठवडी तुमचे कार्य म्हणजे नविन करारातील काही गोष्टी वाचाव्या आणि येशू तुमच्या बरोबर चालत आहे हे पहावे. ज्यावेळेस त्याने तुमची मदत केली त्याबद्दल लिहा किंवा तुम्ही त्याला मागीतले म्हणून त्याने इतर कोणाची तरी मदत केली. कधी कधी तो आपल्याला कल्पना किंवा विचार देतो, म्हणून तुम्ही येशूने तुम्हाला दिलेल्या कल्पना लिहून काढा. आणि तुमच्या शिक्षकाबरोबर खात्री करा कि हया कल्पना पवित्र शास्त्राशी सुसंगत आहेत का.

**वाचा**

दिवस 1: उत्पत्ति 6:9-22

दिवस 2: उत्पत्ति 7:1-12

दिवस 3: उत्पत्ति 7:13-24

दिवस 4: उत्पत्ति 8:1-12

दिवस 5: उत्पत्ति 8:13-22

# 4. देवाची आज्ञा पाळा



**वीर: नोहा**

उत्पत्ति 6:9-9:17, इब्री 11:7

## पाठांतर वचन 4

याकोबाचे पत्र 1:22: “वचनाप्रमाणे आचरण करणारे असा, केवळ ऐकणारे असू नका; अशाने तुम्ही स्वतःची फसवणूक करता.”

## आवश्यकता गोष्ट 4



किपचे आईवडील प्रवासाला गेले, म्हणून किप त्याच्या चूलत भावांच्या घरी राहिला. जाण्यापूर्वी, किपच्या वडीलांनी त्याला सांगितले कृपाकरून रात्री बाहेर पडू नको, ते जरा धोक्याचे असते. त्यांना निश्चींतपणे प्रवास करावयाचा होता, हे जाणून की किप रात्री बाहेर पडणार नाही. “बाबा, ठीक आहे, मी कोठेहि जाणार नाही.” किपने त्यांना सांगितले. त्याचे आईवडील गेल्यावर, त्याच रात्री, त्याच्या चूलत भावांनी किपला गावात चलण्याचे आमंत्रण दिले. त्याला ती कल्पना फार आवडली, आणि म्हणून त्यांच्यासोबत जाण्यासाठी तो कपडे बदलू लागला. “ठीक आहे, चला.” सर्वजण म्हणाले.

## मुख्य धडा 4

तुम्ही कधी असे म्हटले आहे का, “मी विषारी कोळयाला घाबरत नाही” आणि मग जेव्हा तुम्ही तो विषारी कोळी पाहाता तेव्हा तुम्ही किंकाळी फोडता आणि पळून जाता? किंवा तुम्ही तुमच्या आईला किंवा वडीलांना सांगता की त्यांनी सांगितल्याप्रमाणे तुम्ही कराल, आणि मग त्यांची आज्ञा पाळत नाही? मागील आठवडयात आपण शिकलो की आपण देवाच्या वचनावर विश्वास ठेवला पाहिजे, परंतु तसे म्हणणे आणि त्याप्रमाणे न करणे सोपे आहे! याकोब 2:26 म्हणते की जर आपण विश्वासाप्रमाणे आचरण करीत नाही तर आपला विश्वास मृत आहे. आज आपण अशा मनुष्यांबद्दल शिकणार आहोत ज्याचा विश्वास फारच जीवंत होता.

पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की पूर्ण जग एकदा पूराच्या पाण्याने भरावे असे देवाने ठरविले, कारण लोक दुष्ट होते. देवाने नोहाला तारू (अतिभव्य जहाज), तयार करण्यास सांगितले, जो भूतलावरील एकमेव नीतीमान मनुष्य होता.

वेगवेगळया कारणास्तव देवाची आज्ञा पाळणे कठीण असते. कधीकधी देवाची आज्ञा पाळण्याची आपली इच्छा नसते. नोहाला काय वाटले हे पवित्र शास्त्र सांगत नाही, परंतु मी अंदाज बांधू शकतो की त्याने यापूर्वी तारू तयार केले नव्हते आणि देवाची आज्ञा पाळण्यासाठी त्याला स्वःतामध्ये बदल करण्याची गरज होती.

कधीकधी देवाची आज्ञा पाळणे कठीण असते कारण आपल्याला समजत नाही. तारू बांधण्यासाठी जवळ जवळ 100 वर्षे लागली, नोहाने निळे आकाश पाहिले असेल आणि पावसाचे कोणतेच चिन्ह नव्हते! लहान लेकराला वर्दळ असलेल्या रस्त्यातील धोका कदाचित समजणार नाही, परंतु त्याने आपल्या आईवडीलांची आज्ञा पाळली पाहिजे आणि

त्या रस्त्यापासून दूर राहिले पाहिजे. तुमच्या आईवडीलांनी तुम्हाला असे काहीतरी करण्यास सांगितले आहे का जे तुम्हाला समजले नाही?

कधीकधी देवाची आज्ञा पाळणे कठीण असते की कारण लोक काय म्हणतील याची आपल्याला भिती वाटते. तुम्ही कल्पना करू शकता का की इतर लोकांना नोहा किती विचीत्र वाटत असेल? परंतु जर त्यांनी भविष्यकाळ पाहिला असता, तर त्यांनी नोहाला मदत केली असती आणि त्यांना सुध्दा तारवाच्या सफरीमध्ये घ्यावे अशी विनंती केली असती!

कधीकधी आपण विचार करतो की ते अशक्य आहे. देवाने नोहाला सांगितले की सर्व प्राण्यांच्या जोडया तारवात ने. मांजरींना पाणी आणि तारवासारख्या हालणा-या गोष्टी आवडत नाहीत! नोहाला केवळ मांजरी आणावयाच्या नव्हत्या, तर सिंह आणि मेंढरे आणि इतर प्राण्यांना सुध्दा एकत्र राहण्यासाठी आणावयाचे होते!

तरी देखिल नोहाने आज्ञा पाळली आणि तारू बांधले. आणि मग प्राण्यांनी सुध्दा देवाची आज्ञा पाळली आणि ते स्वःताहून तारवात आले! पूर्ण पृथ्वीवर एक वर्ष आणि दहा दिवस महापूर आला आणि सर्वकाही झाडून नष्ट झाले! पवित्र शास्त्र सांगते की जो कोणी आज्ञा पाळतो तो आपला जीव राखतो. (नीतीसुत्रे 19:16). नोहाच्या आज्ञापालनामुळे केवळ त्याचा जीव वाचला असे नाही, परंतु त्याचे कुटूंब आणि सर्व वेगवेगळे प्राणी सुध्दा वाचले. जर तुम्ही देवाची आज्ञा पाळता तर त्यामुळे इतर लोक सुध्दा वाचतील. आधी आपण किप नावाच्या मुलाविषयी ऐकले. जेव्हा तो आपल्या चूलत भावांसोबत बाहेर जात होता, त्याच्या आईवडीलांनी त्याला जे सांगितले होते त्याची त्याला आठवण झाली आणि तो येणार नाही असे त्याने आपल्या चूलत भावांना सांगितले.

देवाने वचन दिले की आता पुन्हा तो महापूराने पृथ्वीचा नाश करणार नाही आणि त्याने त्यासाठी मेघधनुष्य हे चिन्ह दिले. जेव्हा तुम्ही मेघधनुष्य पाहाता, तेव्हा देवाच्या वचनाचा आणि तुम्ही सुध्दा नोहाप्रमाणे देवाची आज्ञा पाळावी असा विचार करा.

मी देवाची आज्ञा पाळण्याची निवड केली कारण ते श्रेयस्कर आहे.

## निर्णय 4

परंतु निघण्याआधी किपला आपल्या वडीलांचे शब्द आठवले, आणि त्याने आपल्या चूलत भावांना सांगितले की तो त्यांच्यासोबत येणार नाही. आपल्या आईवडीलांची आज्ञा पाळण्याचे किपने ठरविले.



## कृती 4

**नोहा म्हणतो**



आपण उपक्रम करू ज्याला “नोहा म्हणतो” असे म्हणतात, ज्यामध्ये लेकरांनी नोहाची आज्ञा पाळली पाहिजे. (सायमन म्हणतो या परिचीत खेळासारखा हा एक खेळ आहे). सहभागी होणा-या लेकरांसमोर नोहा उभा राहातो आणि त्यांनी वेगवेगळी कृति करावी अशी त्यांना सूचना करतो. जर नोहा म्हणेल, “नोहा म्हणतो वर खाली उडया मारा,” तर लेकरांनी उडया माराव्या. जर तो नोहा म्हणतो असे न म्हणता म्हणेल, “वर खाली उडया मारा” तर लेकरांनी काहीच करू नये. जो खेळाडू नोहाच्या

सांगण्याप्रमाणे करीत नाही किंवा "नोहा म्हणतो" हे न ऐकताच कृति करतो तो अपात्र ठरविण्यात येईल. जेव्हा एकच बालक शिल्लक राहाते किंवा सर्व लेकरे अपात्र ठरतात तेव्हा खेळ संपतो.

## काल रेखा 4


नोहाच्या जीवनासाठी रेष ओढा.

प्रश्न: हनोखाच्या जन्मापासून नोहाच्या जन्मापर्यंत किती वर्षे लोटली होती? उत्तर: 434 वर्षे.

प्रश्न: नोहा किती वर्षे जगला? उत्तर: 950 वर्षे.

## कोडे उत्तर 4

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| इं | आ | वि | ब | रू | नो | कु | रू |
| द्र | रू | टुं | श्वा | ली | हा | टुं | ब |
| ध | कु | श्व | दि | स | ळ | न्या | यी |
| नु | ठे | ज्ञा | इं | द्र | ठे | आ | र |
| ष्य | आ | ज्ञा | पा | ळ | ली | वि | य |
| न्या | य | प | ध | प | नु | ल | ला |
| क | रा | र | ण | ष्य | प्र | णी | श्वा |
| वि | टुं | मे | ब | ल | सां | ग | त |
| प्रा | कु | श्व | ज | र | ता | रू | प |
| णी | आ | र | या | को | बा | चे | त्र |






## प्रश्न आणि उत्तर 4

1. माझे आईवडील मी काय करावे हे मला नेहमी का सांगत असतात? (कारण ते तुमच्यावर फार प्रेम करतात आणि तुमचे चांगले व्हावे असे त्यांना वाटते. तसेच आईवडील सुध्दा मनुष्यप्राणी आहेत आणि चूका करतात याची चर्चा करणे सुध्दा ठीक होईल).

2. देवाची आज्ञा मोडल्यामुळे जर मी लोकप्रिय आणि अद्ययावत होत असेल तर मग काय? (यासोबत संबंधित असलेल्या वेगवेगळया परिस्थितीविषयी बोला. तुमच्या लेकरांना हे समजण्यास मदत करा की अशी वेळ येईल की जेव्हा त्यांना ठरवावे लागेल की देवाची आज्ञा पाळावी किंवा लोकप्रिय व्हावे).

3. यानंतर मी सुखाने राहीन का? (बाळपणातील दंतकथा, आनंद आणि भौतिक गोष्टींबाबत, पृथ्वीवरील परिपूर्ण जीवन आणि सार्वकालीक जीवनामध्ये सुखी राहणे म्हणजे काय याबाबत चर्चा करा)


## खेळ 4



**राजा आणि राणी विचारतात!**

- राजा आणि राणीच्या भूमिकेसाठी दोन लेकरांची निवड करा.
- इतर लेकरांसमोर त्यांना दोन खुर्च्यांवर बसण्यास सांगा जणूकाय ते आपल्या राजासनावरच बसले आहेत.
- ते तयार झाले म्हणजे शिक्षक राणीला विचारतील, "तुला काय पाहिजे?"
- राणी खोलीतील एखादी वस्तु मागते, आणि सर्व लेकरे ती वस्तु आणण्यासाठी धावतात, मुली राणीला वस्तु देतात आणि मुले राजाला देतात.
- नंतर शिक्षक राजाला विचारतात की त्याला काय पाहिजे, आणि मागितलेली वस्तु आपल्या राजाकडे किंवा राणीकडे आणण्याचा लेकरे प्रयत्न करतील.
- दिलेल्या वेळेपर्यंत हा खेळ खेळणे चालू ठेवा.
- जी चमू सर्वात जलद, जास्त आदबशीर, आज्ञाधारक राहिल ती विजयी ठरेल.

## हजेरी 4




वर्गात हजर राहण्यासाठी मुलांना त्यांचे आजचे कार्ड द्या. त्यांचे अभिनंदन करा आणि त्यांना दुसरे कार्ड घेण्यासाठी पुढील आठवड्यात येणास प्रोत्साहित करा जेणेकरून ते वीर खेळ खेळू शकतील! आजचे कार्ड आहे: **नोहा**

## गृहपाठ 4

**कार्य**

तुमचा गृहपाठ हा आहे की तुम्ही अशा एक किंवा जास्त गोष्टी लिहा ज्या तुम्ही करू नयेत असे देवाला वाटते आणि त्या करण्याचा तुम्हाला मोह झाला तेव्हा तसे करण्याऐवजी तुम्ही देवाच्या मागे जाणे ठरविले.

**वाचा**

दिवस 1: उत्पत्ति 15:1-6
दिवस 2: उत्पत्ति 15:7-21
दिवस 3: उत्पत्ति 21:1-6
दिवस 4: उत्पत्ति 22:1-10
दिवस 5: उत्पत्ति 22:11-19

# 5. परीक्षा पास करा



**वीर: अब्राहाम**

उत्पत्ति 12:1-7, 15:1-6, 21:1-3, 22:1-19, इब्री 11:8-19

## पाठांतर वचन 5

याकोबाचे पत्र 1:12 "तू त्यांना झग्यासारखे - वस्त्रासारखे गुंडाळशील, आणि ती बदलली जातील; परंतु तू तसाच राहतोस, तुझी वर्षे संपणार नाहीत."

## आवश्यकता गोष्ट 5



ती फार फार महत्वाची परीक्षा होती. प्रत्येकाला या गोष्टीसाठी तयार राहावयाचे होते, कारण त्या परीक्षेच्या निकालाचा कोण ज्ञान ऑलम्पीकमध्ये जातील हे ठरविण्यासाठी विचार केला जाणार होता. म्हणूनच बाहेर खेळायला जाण्याऐवजी पेपीने पूर्ण दिवस अभ्यास करण्यात घालविला - तिला पहिला नंबर मिळवायचा होता. अपेक्षित दिवस आला. प्रत्येकजण तयार होता, आपल्या खूर्चीवर, टोक केलेली पेन्सिल घेउन. पेपीला आश्चर्य वाटले कारण तिने जो अभ्यास केला होता त्यापेक्षा वेगळया विषयावर परीक्षा होती.

## मुख्य धडा 5

ज्याला आपल्या विश्वासाचा पिता म्हटले आहे त्या माणसाविषयी शिकू या. एकदा देवाने अब्राहामाला आपल्या पित्याचे गाव सोडून देवाच्या मागे येण्यास सांगितले आणि अब्राहामाने देवाची आज्ञा पाळली. अब्राहाम आणि त्याच्या पत्नीला संतान होणे शक्य नव्हते. त्याच्या जीवनातील महत्त्वाच्या क्षणी देवाने त्याला सांगितले की जरी तो खूप म्हातारा आहे तरी त्याला पुत्र होणार आहे. इतकेच नाही, तर त्याचे संतान मोठे राष्ट्र होतील आणि सर्व जग त्याच्या द्वारे आशिर्वादीत होईल! अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला आणि देवाने त्याचा तो विश्वास त्याचे नीतीमत्व असे गणिला.

काही वर्षानंतर, अब्राहाम आणि सारेला इसहाक नावाचा मुलगा झाला. काही वर्षांनी देवाने अब्राहामाला त्या मुलाचे अर्पण करण्यास सांगितले, त्याचा मोलवान लहान मुलगा ज्याच्यावर तो फार प्रिती करीत होता आणि जो देवाने अब्राहामाला दिलेल्या वचनाची पुर्तता होता! देवाच्या मनामध्ये इसहाकाला वाचवायचे होते, परंतु देवाने तसे अब्राहामाला अजून सांगितले नव्हते. अब्राहाम देवावर किती प्रिती करतो याची देवाने वाट पाहिली.

कधीकधी आपल्या जीवनासाठी देवाची मोठी योजना असते, परंतु ती योजना खरी होण्याआधी परीक्षा असते. आपण देवावर किती प्रीती करतो हे जाणून घेण्याची देवाची इच्छा असते. आज देव तुम्हाला काय मागत आहे? कधीकधी अशी एखादी गोष्ट असते जी तुम्ही बदलावी असे देवाला वाटते, तुमच्यावर वाईट परिणाम करणारा मित्र, लबाडी करणे किंवा चोरी करणे सोडून देणे. कधीकधी अशी चांगली गोष्ट असते जी तुमच्या देवावरील प्रीतीसोबत झगडत असते. काही लोकांसाठी, देव त्यांना सांगतो की त्यांनी उच्च शिक्षण सोडून द्यावे, कारण त्यांना महत्वाचे पद पाहिजे

असते, काही जणांनी उच्च शिक्षण घ्यावे, जे घेण्याची त्यांची इच्छा नाही. ते संगीत वाद्य असेल, तुमची आवडती व्यक्ती असेल, किंवा आवडते विनोदी चित्र असेल. पुष्कळ ख्रिस्ती लोक काहीतरी सोडण्यासाठी तयार नसतात आणि ते आपल्या विश्वासात रूतून बसतात, वाढणे थांबवितात, पेपीप्रमाणे जिने परीक्षेसाठी चूकीच्या विषयाचा अभ्यास केला. जेव्हा असा क्षण येतो की देव किंवा दुसरे काहीतरी याची तुम्हाला निवड करावयाची असते, तर तुम्ही कशाची निवड कराल?

या अतिशय कठीण समयी अब्राहामाने देवाची आज्ञा पाळण्याची निवड केली. तो इसहाकासोबत पर्वतशिखरावर गेला, त्याने त्याला बांधले, आणि वेदीवर ठेवले. अब्राहाम सु-याने इसहाकाला मारण्याच्या बेतात असतांना देवाने त्याला थांबविले! देवाने त्याला झुडूपामध्ये शिंगे अडकलेला एडका दाखविला आणि त्यांनी इसहाकाऐवजी त्याचे अर्पण केले. परंतु हे स्पष्ट झाले की जगातील दुस-या कोणत्याहि गोष्टींपेक्षा अब्राहाम देवावर जास्त प्रिती करतो.

देवाने अशीच गोष्ट केली जेव्हा त्याने आपल्या जागी मरण्यासाठी आपला स्वतःचा पुत्र पाठविला. येशू म्हणाला की सर्व बाबतीत लोकांनी जसे आपल्याशी वर्तन करावे अशी आपली इच्छा आहे तसेच आपणहि त्यांच्यासोबत वागले पाहिजे. (मत्तय 7:12), आणि मग आपले जीवन देऊन त्याने आपले शब्द प्रत्यक्ष आचरणात उतरविले. देवाने आपल्यासाठी सर्वकाही दिले जे त्याच्याजवळ होते, आणि आपणहि त्याच्यासाठी तसेच करावे असे तो आपल्याला सांगतो.

या जगातील सर्व गोष्टींपेक्षा मी देवावर प्रेम करतो आणि तो मजपासून जे काही मागेल ते देण्याचा निर्णय मी घेतला आहे.


## निर्णय 5



परीक्षा देत असतांना मी फार निराश झाली. सर्वांनी परीक्षा दिल्यानंतर शिक्षकांनी परीक्षेचा आढावा घेतला आणि त्यांना निकाल सांगितला. पेपी सोडून प्रत्येकजण परीक्षेत पास झाला. जेव्हा तिच्या सर्व वर्ग सवंगडयानां हे कळले तेव्हा त्यांनी तिची टर उडविली. पेपीला फार दुःख झाले.

## कृती 5

**पौप प्रश्नमंजूषा**



या उपक्रमाकडून हे पाहावयाचे आहे की विद्याथ्र्यांना काय जास्त पाहिजे आहे, जगिक किंवा आत्मिक गोष्टी. लेकरांना सांगा की वर्गामध्ये तीन पौप प्रश्नमंजुषा असतील. त्या केव्हा घेतल्या जातील हे त्यांना माहित नसणार.

प्रश्नमंजुषा:

1. वर्गामध्ये लेकरांना दिसतील आणि त्यांना ती घेता येईल अशा ठिकाणी नाणे ठेवा. वर्ग चालू असतांना पाहा की कोणी ते नाणे घेतले का किंवा ते पाहिल्यावर ते काय करीत आहेत. जर लेकरांनी ते पैसे घेतले नाहीत तर त्यांनी परीक्षा उतीर्ण केली असे होईल.

2. प्रत्येक लेकरांसाठी काहीतरी विशेष खाद्यपदार्थ आणा, परंतु ते सारखे नाही हे पक्के करा. काही खाद्यपदार्थ दुस-या खाद्यपदार्थांपेक्षा चांगले असतील. विद्याथ्र्यांना सांगा की प्रत्येकासाठी विशेष खाउ ठेवला आहे आणि त्यासाठी प्रत्येकाने समोर यावे. जे लेकरे चांगले खाद्यपदार्थ घेत नाहीत ते परीक्षेत पास झाले असे समजले जाईल.


3. त्यांना सेवा करण्याची संधी द्या. वर्ग झाल्यानंतर लेकरांनी वर्गखोली स्वच्छ करावी असे त्यांना सांगा. जो कोणी चांगली स्वच्छता करील तो पास होईल.

निष्कर्ष: तीनहि परीक्षा घेतल्यावर निकाल काय लागला, कोण पास झाले आणि का पास झाले हे स्पष्ट करा

## काल रेखा 5

अब्राहामाच्या जीवनासाठी रेषा काढा.
प्रश्न: अब्राहामाचा जन्म झाला तेव्हा नोहा किती वर्षांचा होता? उत्तर: 890 वर्षे.
प्रश्न: अब्राहाम किती वर्षे जगला? 175 वर्षे

## कोडे उत्तर 5



| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | म्ही | स्ती | स | तु | म्ही | श्च | आ | म | स्ती |
| ह | आ | भ्या | र | प | अ | णे | ध्या | श्च | टी |
| त्व | अ | प | य | शी | र | रू | त्मि | सो | र्य |
| पू | श्च | न | ण | क | ता | मे | क | ख्रि | पू |
| र्ण | त्मि | क्ष | त | म्ही | अ | प | श्च | स्ती | म |
| स्ती | री | हि | म्ही | आ | जी | दि | शा | र | क |
| प | मा | त्मि | क | ला | म | व | स | प | शी |
| आ | श्च | य | ख्रि | स्त | र | स | न | अ | न्या |



## प्रश्न आणि उत्तर 5

1. जर कोणी तुमची जागा घेतली किंवा तुमच्यापेक्षा काहीतरी फार चांगले केले तर तुम्ही काय कराल? (चर्चा करा की तुम्ही कडू होण्याऐवजी त्या व्यक्तीला किंवा शिक्षकाला क्षमा करावी म्हणून देवाची मदत कशी घ्याल. तसेच पुढील संधीसाठी तुम्ही कसा जास्त अभ्यास किंवा काम कराल)

2. देवाने घेतलेली तुमची शेवटची परीक्षा कोणती होती? (ते लहान किंवा मोठे लेकरे असोत, ते सर्वजण अशा वेळेमधून गेले असतील जेव्हा त्यांना नक्की वाटले की देवाने त्यांची मदत केली किंवा त्यांना आव्हान दिले. एखादे उदाहरण सांगण्यास त्यांना संधी द्या. ख्रिस्टीनाच्या जीवनातील एक उदाहरण, या अभ्यासक्रमाच्या लेखिका: मी जेव्हा लहान होते तेव्हाच्या लहान परीक्षा मला आठवतात. एकदा मी देवाला वचन दिले की मी नृत्य पाहण्यास जाणार नाही. मला वाटले ते अतिशय सोपे आहे, परंतु माझ्या चर्चने नृत्य कार्यक्रम ठेवला! किती आश्चर्यकारक! माझे वचन पाळणे आणि ख्रिस्ती कार्यक्रमाला न जाणे कठीण होते)

3. आपल्या आध्यात्मिक जीवनात आपल्याला चांगले गूण कसे मिळतील? (येथे आपण काळजी घेतली पाहिजे की आपल्या विद्यार्थ्यांना परूषी लोकांसारखे होण्यासाठी आपण प्रशिक्षित करणार नाही, त्यांनी इतरांनी पाहावे म्हणून "धार्मिक गोष्टी" करू नयेत. धार्मिक असणे आणि मनापासून येशूला अनुसरणे यामध्ये असलेला फरक समजण्यासाठी त्यांची मदत करा. तुम्ही जे काही करता ते इतरांनी पाहावे म्हणून करता काय? जे काही मी करतो ते देवाला पाहिजे म्हणून करतो का, जरी बाकी कोणीहि ते पाहात नाही?)


## खेळ 5

**वस्तू ओळखा**



- ब-याचशा वस्तु गोळा करा (फुले, पेन्स, बटणे, चेंडू, बो, कानगोल इत्यादी). त्या वस्तु लेकरांना दिसू देऊ नका.
- दोन लेकरांचे डोळे बंद करा आणि त्या वस्तुंचा वास घेउन, परिक्षण करून, त्या कोणत्या आहेत याचा अंदाज करण्यास त्यांना सांगा.
- लेकरांचे गट करा आणि वस्तु पिशवीत ठेवा आणि ती प्रत्येक गटामध्ये फिरवा, विद्याश्र्यांना वस्तुला स्पर्श करू द्या आणि जास्तीत जास्त वस्तु ओळखण्याची त्यांना संधी द्या.

## हजेरी 5




वर्गात हजर राहण्यासाठी मुलांना त्यांचे आजचे कार्ड द्या. त्यांचे अभिनंदन करा आणि त्यांना दुसरे कार्ड घेण्यासाठी पुढील आठवड्यात येणास प्रोत्साहित करा जेणेकरून ते वीर खेळ खेळू शकतील! आजचे कार्ड आहे:

**अब्राहाम**

## गृहपाठ 5

**कार्य**

या आठवडयातील तुमचे कार्य आहे की तुमची स्वप्ने लिहावीत, अशा गोष्टी ज्या तुमच्या जीवनात कराल अशी तुमची आशा आहे. त्या तुमच्या आवडत्या गोष्टी असतील, जसे की अंतराळवीर होणे, पट्टीचे पोहोणारे, सैनिक, डॉक्टर, व्यवसाय मालक. मोठे स्वप्न पाहा - तुमचा देव मोठा आहे. आणि मग देवाला मागा की त्याच्यासाठी तुम्ही काय सोडून द्यावे, तुमच्या शिक्षकांकडून त्याची तपासणी करा आणि मग या आठवडयात तसे करा

**वाचा**

दिवस 1: उत्पत्ति 25:19-26


दिवस 2: उत्पत्ति 25:27-34

दिवस 3: उत्पत्ति 27:1-17

दिवस 4: उत्पत्ति 27:18-29

दिवस 5: उत्पत्ति 27:30-45

# 6. आध्यात्मिक गोष्टींना किंमत द्या



**वीर: इसहाक**

उत्पत्ति 25:19-34, 27:1-40, इब्री 11:20

## पाठांतर वचन 6

मार्क 8:36, “कारण मनुष्याने सर्व जग मिळवले आणि आपल्या जिवाचा नाश करून घेतला तर त्याला काय लाभ?”

## आवश्यकता गोष्ट 6



ती फार पहाटेची वेळ होती जेव्हा बझच्या आईने त्याला त्याच्या आजीकडे कपभर साखर मागण्यासाठी पाठविले. तो उठला आणि आपल्या आजीच्या घरी गेला. पहिली गोष्ट जी त्याने मेजावर पाहिली ती होती पैशाचे नाणे. तो ओरडला, “आजी, आजी,” आणि आजीने उत्तर दिले नाही. बझला वाटले मला कोणी पाहात नाही, आणि जर मी ते नाणे घेतले तर कोणीहि माझी गंमत करणार नाही, कारण मग मला साखरेची मिठाई विकत घेता येईल. मी ते नाणे घेईल आणि कोणाला कळणार सुध्दा नाही. काही मिनीटांनी त्याची आजी आली आणि तिने बझला कपभर साखर दिली.

## मुख्य धडा 6

मागील आठवडयात आपण परीक्षेत उतीर्ण होण्याविषयी शिकलो. आज आपण शिकणार आहोत की आपण सातत्याने आध्यात्मिक गोष्टींना शारीरीक गोष्टींपेक्षा महत्व दिले पाहिजे.

अब्राहामाचा मुलगा इसहाक मोठा झाला आणि त्याचे स्वतःचे कुटुंब झाले. स्वतःची पत्नी स्वतः निवडण्याऐवजी त्याने आपल्या वडीलांना त्याच्यासाठी पत्नी निवडू दिली. (उत्पत्ती 24). नंतर इसहाक आणि त्याच्या पत्नीला जूळी मुले झाली, एसाव आणि याकोब.

एकदा एसाव शिकार करून घरी आला आणि त्याला इतकी भूक लागली की असे वाटू लागले की भूकेने तो मरतो की काय. त्याला काहीतरी खाण्याची एवढी इच्छा होती की त्यासाठी तो काहीहि देण्यास तयार होता! तुम्हाला कधीतरी अशी तीव्र इच्छा होती का जिच्यासाठी तुम्ही काहीहि देण्यास तयार होता? याकोबाने एसावाला युक्तीने फसविण्याचे ठरविले. तो एसावाला म्हणाला मी तुला तुझ्या ज्येष्टत्वाच्या हक्काच्या बदली जेवण देईल आणि एसाव त्यासाठी तयार झाला! एका कपभर डाळीसाठी त्याने आपल्या पूर्ण जीवनाचा हक्क देवून टाकला!

त्या दिवसांमध्ये, वडील मरणापूर्वी आपल्या मुलांना आशीर्वाद देत असत. इसहाक म्हातारा झाला आणि त्याची दृष्टी मंदावली आणि त्याने बेत केला की एसावाला आशीर्वाद द्यावा. परंतु याकोबाने आपल्या आईच्या सल्ल्याप्रमाणे केले, एसावासारखा पोशाख केला आणि आशीर्वाद मिळवला. एसावाला वाटले एक कप डाळीच्या कालवणचा जास्त फरक पडणार नाही, परंतु जेव्हा त्याला आपला ज्येष्टत्वाचा हक्क पुन्हा हवा होता, तेव्हा तो त्याला वापस मिळाला नाही! तो हक्क तो नेहमीसाठी गमावून बसला होता.

इसहाकाला आध्यात्मिक गोष्टींचे मोल वाटत होते. त्याने देवाच्या वचनांवर विश्वास ठेवला की त्याचे वंशज देशात वस्ती करतील आणि त्याने त्या वचनांनी याकोबाला आशीर्वाद दिला.

देवाजवळ आपणा प्रत्येकासाठी ज्येष्टत्वाची योजना आणि आशीर्वाद आहे. परंतु जर आपण काळजी घेतली नाही, तर आपल्या निवडीमुळे आपण ती योजना दूर लोटू शकतो! ते करण्याचा एक मार्ग आहे पाप करणे. जेव्हा तुम्ही लबाडी करता आणि तुम्ही मिळवलेल्या गूणांपेक्षा जास्त गूण मिळविले आहेत असे सांगता, तेव्हा काही वेळासाठी तुम्ही चांगले दिसाल, परंतु तुम्ही तुमची विश्वासयोग्यता गमावून बसला आहात! अगोदर बझ त्याच्या आईचे नाणे घेण्याचा विचार करीत होता, परंतु पेपी घरी आली आणि त्याने बझला वाचविले! तिने त्याला सांगितले त्याचा आत्मा पैशाच्या नाण्यापेक्षा जास्त मोलवान आहे आणि बझने नाणे वापस ठेवले.

जेव्हा तुम्ही मोठे होता, तेव्हा ते अधिकच धोकेदायक होते. पुष्कळ ख्रिस्ती लोक व्यक्तीचे हृदय पाहण्याऐवजी, रूप पाहून किंवा हुद्दा पाहून लग्न करतात. मग जेव्हा त्यांना देवाची सेवा करायची असते तेव्हा त्यांचा स्वतःचा जोडीदार आड येतो. आणि कोणाशी लग्न करावे हा निर्णय तर कायमचा असतो! एसावाने अशा स्त्रियांसोबत लग्न केले ज्यांनी इसहाक आणि रिबेकेला जेरीस आणले. (उत्पत्ती 27:46). त्याच्या उलट, इसहाक आणि त्याचा मुलगा याकोब यांनी जोडीदाराची निवड करतांना आध्यात्मिक निवड केली.

येशूने म्हटले या जगाच्या चिंता आणि संपत्तीची फसवणूक तुम्हाला फलदायी होण्यापासून थांबवेल, तुमचा जन्मसिध्द हक्क घेण्यापासून थांबवेल. (मत्तय 13:22). तुमचा जन्महक्क तुम्ही तूच्छ मानणार नाही आणि त्याची कशा सोबतहि अदलाबदल करणार नाही याची खात्री करून घ्या, मग तुम्ही त्याची कितीहि मोठी इच्छा बाळगत असाल.

मी जीवनातील आध्यात्मिक गोष्टीं शारीरीक गोष्टींपेक्षा महत्वाच्या आहेत याची निवड केली.

## निर्णय 6



त्या क्षणी पेपी घरात आली आणि तिने तो दिवस वाचवला! ती बझला म्हणाली तुझा आत्मा त्या पैशाहून कितीतरी मोलाचा आहे! बझला समजले की तो काय करणार होता, आणि त्याने नाणे लगेच वापस केले, आपली मैत्रीण पेपीचे त्याने आभार मानले.

## कृती 6

**निर्णय स्मरणिका**



या उपक्रमामध्ये, लेकरे एका सेफटी पिनला रिबनचा तुकडा बांधतील आणि आठवडयामध्ये जे महत्वाचे निर्णय ते घेतील त्याची आठवण ठेवण्यासाठी वापरतील. रिबन कपडयाला बांधता येईल. एकत्र प्रार्थना करा की देव त्यांना आध्यात्मिक निर्णय घेण्याची आठवण देईल.

## काल रेखा 6


इसहाकाच्या जीवनाची रेष ओढा.


प्रश्न: इसहाकाचा जन्म झाला तेव्हा अब्राहाम किती वर्षाचा होता? उत्तर: 100 वर्षे.

प्रश्न: इसहाक किती वर्षे जगला? उत्तर: 180 वर्षे

## कोडे उत्तर 6

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ए | सा | ब | ज्ये | आ | शी | र्वा | द |
| ष्ठ | ही | ब | ष्ठ | नि | आ | ड | शा |
| सु | को | आ | त्वा | व | ध्या | स | री |
| या | ळा | ज्ञा | चा | ड | त्मि | हा | रि |
| वा | ट | पा | ह | णे | क | क | क |
| भा | ही | ळ | क्क | हा | आ | हा | या |
| ना | ऊ | णे | स | ए | ध | नि | को |
| वा | त्वा | इ | ज्ये | सा | ळा | ह | व |
| म | सु | री | चे | व | र | ण | क्क |





## प्रश्न आणि उत्तर 6


1. अशी काही उदाहरणे कोणती आहेत जी दाखवितात की आपण आध्यात्मिक जगापेक्षा भौतिक जगाला जास्त मोल देतो? (विद्यार्थ्यांना काही कल्पनांवर चर्चा करू द्या: मित्र, काम, लोकप्रियता, चर्चमध्ये सेवा करणे इत्यादी.)

2. जर तुम्हाला बरोबर असलेली गोष्ट आवडत नसेल तर काय होईल? (विद्यार्थांना आपला अनुभव सांगण्यास वेळ द्या)

3. जर सहभागी न होणारा मी एकटा असेल तर मग काय? (जेव्हा कोणीहि योग्य गोष्ट करीत नाही तेव्हा योग्य गोष्ट करणे किती कठीण आहे याबाबत चर्चा करण्यासाठी त्यांना संधी द्या).


## खेळ 6

**चांगले आणि वाईट**



लेकरांसाठी चांगले आणि वाईट समजणे कठीण असते. या खेळामध्ये आध्यात्मिक मुल्ये कशी ओळखावीत याची आपण तालीम करू.
दोन भांडे न शिजवलेल्या तांदूळाने भरा, प्रत्येक भांडयामध्ये 15 लहान सेफ्टी पिन्स टाका (सर्व सेफ्टी पिन्स पक्क्या बंद आहेत याची खात्री करून घ्या).
तांदूळ आणि सेफ्टी पिन्स चांगल्या एकत्र करा. दोन टीम मधून एका लेकराचे डोळे बांधा.
जेव्हा शिक्षक म्हणतील, ‘‘जा’’ तेव्हा दोन मुले आपल्या हाताने, न पाहाता, तांदूळातील सेफ्टी पिन्स शोधण्याचा प्रयत्न करतील आणि जेवढया मिळतील तेवढया घेतील. त्यांना कळेल की तांदूळ आणि सेफ्टी पिन्समधील फरक लक्षात येणे फार कठीण आहे. काही वेळ खेळा आणि प्रत्येक मुलाच्या पिन्स मोजा. ज्या चमूने जास्त पिन्स काढल्या ती चमू विजयी होईल.

## हजेरी 6




वर्गात हजर राहण्यासाठी मुलांना त्यांचे आजचे कार्ड द्या. त्यांचे अभिनंदन करा आणि त्यांना दुसरे कार्ड घेण्यासाठी पुढील आठवड्यात येणास प्रोत्साहित करा जेणेकरून ते वीर खेळ खेळू शकतील! आजचे कार्ड आहे:

**इसहाक**

## गृहपाठ 6

**कार्य**

या आठवडयासाठी तुमचा गुहपाठ आहे तुमच्या जन्महक्काबाबत लिहीणे, तुम्ही जे जीवन जगणार आहात त्याबाबत लिहीणे. प्रथम, तुमचा जन्महक्क काहीच नाही असे समजू नका. तो फार मोलाचा आहे. कदाचित मॅकॅनिक किंवा इंजिनियर किंवा नर्स असेल. तुमच्या शेजा-यांमध्ये किंवा तुमच्या देशामध्ये तुम्ही फरक करू शकता. परंतु तुमच्या आध्यात्मिक जन्महक्का बाबत हि लिहा. तुम्ही देवाचे मुल आहात आणि त्याच्या पराक्रमी कुटूंबामध्ये आहात. देवाने तुम्हाला वेगवेगळी कौशल्ये आणि इच्छा दिलेल्या आहेत, आणि आध्यात्मिक कुटूंबात यशस्वी होण्यासाठी तो त्यांचा उपयोग करून घेईल. तुम्ही हे तुमच्या शिक्षकांना दाखवू शकाल, परंतु दाखवलेच पाहिजे असे काही नाही. देवासाठी तुमचे ह्रदय मुल्यवान आहे.

**वाचा**

दिवस 1: उत्पत्ति 28:10-15
दिवस 2: उत्पत्ति 28:16-22
दिवस 3: उत्पत्ति 32:1-8
दिवस 4: उत्पत्ति 32:22-27
दिवस 5: उत्पत्ति 32:28-32

# 7. देवाचा आशीर्वाद



**वीर: याकोब**

उत्पत्ति 27:41-28:2, 28:10-15, 28:20-22, 31:3-13, 31:22-24, 32:9-12, 32:22-30, 33:1-11, 35:1-5, इब्री 11:21

## पाठांतर वचन 7

लूक 11:28 "तेव्हा तो म्हणाला, "पण त्यापेक्षा जे देवाचे वचन ऐकतात व पाळतात ते धन्य!."

## आवश्यकतेची गोष्ट 7



कौमेटचा एक मित्र होता जो नेहमी त्याला पार्टीसाठी बोलावित असे, परंतू एका दिवशी त्याने पाहिले कि पार्टीला येणारे सर्व मुलं वाईट वागत. त्याला त्या पार्टीमध्ये असणे बरोबर वाटले नाही. त्याला माहित होते कि जेव्हा मुलं वाईट वागतात तेव्हा ते देवाला आवडत नाही. एकदा सुट्टीच्या दिवशी त्याच्या मित्राने त्याला आणखी एका पार्टीचे आमंत्रण दिले आणि म्हटले कि ही पार्टी सर्वात चांगली राहील. कौमेट ला जाण्याची खूप इच्छा होती परंतू तो खंबीर राहीला आणि त्याने 'नाही' म्हटले. जेव्हा त्याच्या मित्राने हे ऐकले तेव्हा तो म्हणाला,' जर तू माझया बरोबर येणार नाहीस तर मी पुन्हा कधीच तुझयाबरोबर बोलणार नाही. तू तुझा जीवलग मित्र गमावशील.' हयामूळे कौमेट ला अतिशय दु:ख झाले. त्याला माहित नव्हते कि काय करावे. त्याला माहित होते कि पार्टीला जाणे वाईट होते, परंतू त्याला त्याचा मित्र गमावण्याची इच्छा नव्हती.

## मुख्य धडा 7

जीवनामध्ये आपल्याला निवड करावी लागते, भौतिक (शारीरिक) किंवा देवाचे आर्शीवाद (आत्मिक) हया मध्ये. एसावाचा जेष्टत्वाचा हक्क घेतल्या नंतर याकोब पळाला कारण त्याला वाटले कि एसाव त्याला जीवे मारिल (शरीरिक), परंतू तो त्याच्या आईवडीलांची आज्ञा पाळून देवाचा आर्शीवादाचा देखील पाठलाग करत होता (आत्मिक) पवित्र शास्त्र सांगते वाटेत त्याच्या जवळ सामान म्हणून केवळ एक काठी होती (भौतिक) झोपलेला असतांना त्याला एक स्वप्न पडले ज्यात त्याने देवदूतांना शिडीवरून स्वर्गात वर जातांना व खाली येतांना पाहिले. आणि देवाने त्याला (आत्मिक) अभिवचन दिले कि त्याचे पुत्रपौत्र होतील जे हा देश वतन करून घेतील. याकोबाने देवाला मागणी केली कि त्याने त्याच्या बरोबर राहावे (आत्मिक) जे इतर कोणत्याही भौतिक गोष्टी पेक्षा चांगले होते.

याकोव त्याच्या दुरक्ष्या कुटुंबाला भेटला, त्याने लग्न केले त्याला मुले झाली आणि त्याने त्याचा मामा लाबान हयाच्यासाठी 21 वर्ष काम केले! त्याच्या मामाने त्याला सारखे सारखे फसविले (भौतिक) परंतू देवा याकोबाबरोबर होता त्याने त्याला मोठे कुटुंब आणि संपत्ति देउन आर्शीवाद दिला... (आत्मिक) याकोबामूळे लाबानाला देखील आर्शिवाद प्राप्त झाला! उत्पत्ति 30:27 कधी कधी आपल्या जीवनातील आर्शीवाद आपल्या आजूबाजूच्या लोकांना

देखील स्पर्श करतात. परंतू याकोब चिडला आणि लाबानपासून पाळून गेला (शारीरिक), देव लाबाना बरोबर बोलला आणि त्याने याकोबाचे संरक्षण केले (आत्मिक)

याकोब घरी परत जाण्यासाठी घाबरत होता! जर एसाव अजूनही त्याला मारू इच्छित असेल तर? त्याने त्याच्या कुटुंबाला आणि त्याच्या मालमत्तेला भागात विभागले जेणे करून जर एका भागावर हल्ला झाला तर दुसरा सुरक्षित राहू शकेल (शरीरिक) रात्रीच्या वेळेस तो त्याच्या आर्शीवादासाठी देवाबरोबर लढाला (आत्मिक) याकोबाला आश्चर्य वाटले कि एसाव धावत आला व त्याने त्याला मिठी मारली! आणि याकोबाने एसावाला मोठी भेट दिली. जेव्हा आपण भौतिक किंवा शरीरिक आर्शिवादांपेक्षा देवाच्या आर्शिवादाना महत्व देतो तेव्हा आपण लोकांना घाबरण्या ऐवजी उदार होवू शकतो.

नंतर देवाने याकोब व त्याच्या कुटुंबाला इतर कुठलेही देव असल्यास ते नष्ट करण्यास सांगितले, म्हणून त्यांनी त्यांच्या मुर्त्या आणि सोन्याच्या अंगठया पुरल्या (भौतिक) जेव्हा त्यांनी असे केले तेव्हा जो कोणी त्यांची हानी करू इच्छित होता तो त्यांना घाबरला! (आत्मिक) याकोब म्हणाला,' मी जिथे गेलो तिथे देव माझया बरोबर होता.' उत्पत्ति 35:3

याकोबासारखं आपणही शारीरिक आणि आत्मिक बाजू असलेल्या जगात राहतो. जग आणखी मान, खेळण्या, चांगले दिसणे, प्रसिध्दी,आणि अधिक चांगले शिक्षण हयाच्यासाठी लढत आहे. ख्रिस्ती लोक सुध्दा चर्च मध्ये जाउन असा दावा करू शकतात कि ते पवित्र शास्त्राशी सहमत आहेत, आणि तरी सुध्दा भौतिक गोष्टींसाठी लढण्यात आपले जीवन घालवू शकतात, जरी येशूने म्हटले कि तुम्ही पैसा व देव हया दोघांचीही सेवा करू शकत नाही. (लूक16:13)

देवाच्या आत्मिक आर्शीवादांसाठी लढणे अधिक चांगले आहे. आपण देवाच्या अधिक जवळ जाण्यासाठी, देवाची सेवा करण्यासाठी मंडळीमध्ये सेवा करण्यासाठी आणि इतरांना त्याच्या बद्दल सांगण्यासाठी लढू शकतो. आपण आपले जीवन देवासाठी पूर्णपणे उघडण्यासाठी आणि त्याच्या कडून काहीच लपवून न ठेवण्यसाठी लढू शकतो. आपण इतरांना आपल्या पेक्षा वरच्या जागेवर ठेवण्यासाठी आणि देवाला जे आवडते ते करण्यासाठी लढू शकतो. येशूने म्हटले कि जे कोणी देवाचे वचन ऐकून त्याचे पालन करतात ते आर्शीवादीत होतात. (लूक11:28) याकोबच्या जीवनाप्रमाणे देवाचे आर्शीवाद भौतिक गोष्टींच्या रूपात येतात, सहसा ते इतर गोष्टी जसे सुरक्षा किंवा बदललेले अंतकरण हयाच्या स्वरूपात येतात. आधीच्या गोष्टीतील कौमेट , पार्टीला न जाउन देवाच्या आर्शीवादासाठी लढू शकतो.

मी भौतिक गोष्टींच्या ऐवजी आत्मिक गोष्टींसाठी लढण्याची निवड करू शकतो.


## निर्णय 7



तो खूप दुःखी होता म्हणून टॅफी त्याच्या कडे आली तेव्हा तिने त्याला विचारले, 'काय झाले?' कौमेट ने जे झाले ते सांगितले. मग टॅफी त्याला म्हणाली,'वाईट वाटून घेउ नका- देवाला संतोषविणे सर्वात उत्तम निवड आहे. इतर कोणा पेक्षाही देवाला ज्यास्त मित्र आहेत. पार्टीला न गेल्यामूळे मित्र गमाविण्याबद्दल काळजी करू नको. तिने त्याची पाठ थापली आणि ती निघून गेली. कौमेट ला समजले आणि त्याने पार्टीला न जाता देवाला संतुष्ट करण्याचा निर्णय घेतला.

## कृती 7

**आशीर्वादासाठी लढणे**



एका पोस्टरवर आर्शीवादासाठी लढणे लिहा आणि ते भिंतीला चिटकवा. लहान कागदावर अनेक आर्शीवाद लिहा. ते आर्शीवाद कशाच्या तरी वर किंवा खाली लपवून खोलीभर पसरवा. मुलं ते आर्शीवाद मिळविण्यासाठी शोधतील आणि मग ते 'आर्शीवादासाठी लढणे' पोस्टरवर चिटकवतील. जेव्हा नेमलेली वेळ संपेल, तेव्हा मुलांना पोस्टर समोर उभं राहून आळीपाळीने आर्शीवाद वाचू दया. मुलांनी वाचलेले आर्शीवाद मिळाले असतील तर त्यांना हात वर करायला सांगा.

## काल रेखा 7


याकोबाच्या जीवनाची रेष काढा.

प्रश्नः जेव्हा यकोबाचा जन्म झाला तेव्हा इसहाक किती वर्षाचा होता? उत्तर 60 वर्षाचा.

प्रश्नः याकोब किती वर्ष जगला? उत्तरः 147 वर्ष

## कोडे उत्तर 7

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रा | या | आं | ध | ळा | वं | या | नि |
| हा | को | हे | क | र | श | को | व |
| पा | ब | श | श्ध | ना | ल | व | ड |
| ए | दद्र | मे | त्र | सु | न | दू | णे |
| इ | र | आ | शी | र्वा | द | दि | ला |
| प | स्त्रा | ऊ | रा | त्मि | स्व | ऊ | ए |
| स्व | प्न | ए | हे | म | भा | पु | प्न |
| ऊ | री | सा | ल | ढ | णे | इ | त्र |
| ल | दे | व | दू | त | आ | ब | स्त्रा |





## प्रश्न आणि उत्तर 7

1. माझयासाठी उत्तम ते हवे असणे चूकीचे आहे का? (हया बद्दल बोलण्याचा प्रयत्न करा. जे उत्तम त्याच्यासाठी देवाबरोबर झगडणे याकोबासाठी चांगले होते. आपण इतरांना पहिले स्थान दिले पाहिजे, परंतू आपण आपल्या जीवनासाठी उत्तम आर्शीवाद मिळविण्यासाठी आपला आत्मा आणि मन हयाची काळजी घेतली पाहीजे!)

2. सर्वांना मी आवडावे हे महत्वाचे आहे नाही का? (आपल्या शेजा-यावर प्रिती करणे आणि देवाला प्रथम स्थान देणे हयातील तणाव हयावर चर्चा करा. पवित्र शास्त्र सांगते कि आपण सर्वांबरोबर शक्य तो श्ज्ञांतीने राहवे) रोम 12:18 परंतू इतरांनी काहीही निर्णय घेतला तरी आपण देवाचे अनुकरण केले पाहिजे (योहान 21:22 ) विशिष्ट प्रसंगांची चर्चा करा

3. जर मी चुकलो तर मी माझयासाठी देवाचे आर्शीवाद गमावू शकतो का? मागील आठवडा आठवतो का? इसावाचे मूल्य चूकीचे होते म्हणून त्याने सर्वकाही गमाविले. याकोबाने त्याच्यासाठी लढाई केली म्हणून त्याला अधिक आर्शीवाद प्राप्त झाले.

## खेळ 7

**बाटलीची लढाई**

रिकाम्या सोडयाच्या बाटलीला थोडे जड करण्यासाठी त्यात वाळू भरा.



- आधार निवडा.
- शोधक बनण्यासाठी एक मुलगा निवडा.
- शोधक शक्य तिक्या दुर बाटल फेकेल
- ज्या दिशेने बाटली फेकली गेली त्याच्या विरूध्द दिशेने बाकी मुलं लपण्यासाठी धावतील. शोधक बाटली पर्यंत पोहचण्याआधी त्यांनी लपावे.
- बाटली आधारावर पोहचविल्या नंतर शोधक लपलेल्या मुलांपैकी एकाला शोधण्याचा प्रयत्न करील.
- जेव्हा त्याला तो सापडेल तेव्हा ते आधाराकडे धावतील. शोधक बाटली घेतो आणि बेसला मारतो आणि म्हणतो ‘1,2,3 झाडा मागे लुसी’ मग शोधक दुस-या लपलेल्यांना बंधक करण्यासाठी शोधायला जाईल.
- लपलेले मुलं इतरांना सोडवू शकतातः शोधकाकडून वाचून,जसे टोनीने आधाराकडे धावावे आणि बाटली हातात घेउन म्हणावे,‘1,2,3 माझ्यासाठी आणि माझया सर्व मित्रांसाठी.’ शोधक त्याचे बंधक गमावेल आणि टोनीने त्याचे सर्व मित्र सोडवले असे होईल.
- जर कोणी सोडवले नाही आणि शोधकाने सर्वांना सोडविले तर शोधक जिंकेल.
- पुन्हा खेळण्यासाठी, पहिला बंधक नविन शोधक बनेल.

## हजेरी 7




वर्गात हजर राहण्यासाठी मुलांना त्यांचे आजचे कार्ड द्या. त्यांचे अभिनंदन कराआणि त्यांना दुसरे कार्ड घेण्यासाठी पुढील आठवड्यात येणास प्रोत्साहित करा जेणेकरून ते वीर खेळ खेळू शकतील! आजचे कार्ड आहे:

**याकोब**

## गृहपाठ 7

**कार्य**

हया आठवडी तुमचा गृहपाठ हा आहे कि मागील दोन आठवडयात तुम्ही जो विचार केला व लिहिले त्याची आठवण करावी, तुमचे स्वप्न आणि तुमचा जन्मसिध्द हक्क. त्याबद्दल पुन्हा विचार करा, परंतू हाही विचार करा कि काही गोष्टी करून तुम्ही त्या कशा नष्ट करू शकता. जर तुम्ही घरी बंडखोर असला तर त्यामूळे तुमच्या नैसर्गिक जन्महक्कावर परिणाम होईल. जर तुम्ही डॉक्टर किंवा इंजिनियर होण्याचे स्वप्न पाहीले तर तुम्ही शाळेत चांगला अभ्यास न करून ते स्वप्न नष्ट करू शकता. जर तुमच्या स्वप्नासाठी चांगल्या आरोग्याची गरज आहे तर तुम्ही सिगारेट ओढून, मादक पदार्थ किंवा दारूचे सेवन करून ते नष्ट करू शकता. तुमचे स्वप्न किंवा तुमचा जन्म सिध्द हक्क पूर्ण करण्यासाठी तुम्ही कसे जीवन जगू शकता ते लिहा.

**वाचा**

दिवस 1: उत्पत्ति 37:1-11

दिवस 2: उत्पत्ति 37:12-24

दिवस 3: उत्पत्ति 37:25-36

दिवस 4: उत्पत्ति 41:1-13

दिवस 5: उत्पत्ति 41:25-41

# ८. देवावर भरवसा ठेवा



**वीर: योसेफ**

उत्पत्ति 37:2-11, 37:17-36, 39:1-41:13, 41:14-16, 41:28-40, 41:56-42:5, 45:1-15, 47:5, इब्री 11:22

## पाठांतर वचन 8

गलतीकरांस पत्र 6:9 "चांगले करण्याचा आपण कंटाळा करू नये; कारण आपण न खचलो तर यथाकाळी आपल्या पदरी पीक पडेल."

## आवश्यकता गोष्ट 8



पेपी शाळेत आहे व तिची मैत्रिण झीप हिच्या जवळ बसली आहे. त्यांना शाळेला जायला आवडतं. आज सकाळी शिक्षिकेने त्यांना गोष्ट तयार करायला सांगितली. पेपीला ते करायला आवडतं म्हणून तिने पटकन ते केले. आणि ते संपविणारी ती पहिली व्यक्ति होती आणि तिने पटकण म्हटले, 'बाई माझे झाले.' तुम्हाला काय वाटते काय झाले असेल? शिक्षिकेने तिच्याकडे दुर्लक्ष केले आणि काहीच उत्तर दिले नाही. दहा मिनिटांनी झीपची गोष्ट तयार झाली आणि तिने म्हटले,'बाई माझे झाले आहे.' शिक्षिका लगेच आली आणि म्हणाली,'झीप तुझी गोष्ट मनोरंजक आहे.' पेपीला खूप राग आला आणि ती म्हणाली, 'बाई माझयाकडे कधीच लक्ष देत नाही, आता ती जे मला सांगेल ते मी कधीच करणार नाही. शेवटी मी जे करते ते तिच्या लक्षात सुध्दा येत नाही.'

## मुख्य धडा 8

मागील आठवडी आपण ज्या याकोबाबद्दल शिकलो त्याला 12 मुलं होते. याकोबाचा आवडता मुलगा योसेफ होता आणि त्याला त्याने सुंदर झगा दिला. त्याच वेळेस योसेफाला एक स्वप्न पडले कि तो त्या सर्वांवर राज्य करत आणि त्याच्या भावांना त्याचा इतका राग आला कि त्यांनी त्याला जीवे मारण्याचे ठरविले! त्या ऐवजी त्यांनी त्याला गुलाम म्हणून विकले. बरेचदा ख्रिस्ती लोकांना वाटते कि देवाचे आर्शीवाद आपल्याला सर्व वाईटापासून दुर ठेवतील. परंतू देव कठिण प्रसंगांचा उपयोग आपल्याला त्याच्या योजनेसाठी तयार करण्यासाठी करत असतो आणि आपण त्याच्यावर भरवसा ठेवू शकतो.

योसेफाला पोटीफराला विकण्यात आले तो मिसरात शिपयांचा कर्णधार होता. त्याने फर्शी पुसण्यापेक्षा देवावर भरवसा ठेवला आणि सर्वात उत्तम काम केले आणि त्याला पोटीफराच्या घराचा ताबा दिला गेला! पोटीफराच्या पत्नीला योसेफ आवडला आणि तिला त्याच्या बरोबर झोपयचे होते. योसेफ देवाचे भय धरत होता आणि त्याची काही चूक करण्याची इच्छा नव्हती. जर कोणी तुम्हाला नेहमी चूक करण्यासाठी मोहात पाडत असेल तर योसेफाने जे केले ते कराः त्या व्यक्ति बरोबर एका खोलीत राहू सुध्दा नका. जरी योसेफाने काही चूक केली नाही तरी तिने त्याच्यावर चूकीचा आरोप लावला आणि त्याला अन्यायी पणे तुरूंगात टाकण्यात आले!

योसेफाने देवावर भरवसा ठेवला आणि देवाने त्याला इतका आर्शीवाद दिला कि तो संपूर्ण तुरूंग चालवत होता! फारोचा प्यालेबदार व भोजनकारभारी तुरूंगात गेले आणि त्याला एका रात्री स्वप्न पडले. योसेफाने विश्वास ठेवला कि देव त्याला त्या स्वप्नांचा अर्थ सांगेल. भोजनकारभारी मरण पावला आणि प्यालेबदाराला त्याची जागा पुन्हा मिळाली, अगदी योसेफाने सांगितल्या प्रमाणे. परंतू प्यालेबदार योसेफाला विसरला! पुन्हा एकदा अन्याय!

दोन वर्षा नंतर, फारोला एक स्वप्न पडले, आणि प्यालेबदाराला योसेफाची आठवण झाली. योसेफाने देवावर विश्वास ठेवण्याचा सराव केला होता आणि त्याने फारोच्या समोर देवावर भरवसा ठेवला. स्वप्नाचा अर्थ असा होता कि सात वर्ष अन्नाची भरपूरी राहिल आणि सात वर्ष दुष्काळ असेल. त्यानंतर तेरा वर्षांच्या कारावासानंतर फारोने योसेफाला मिसर देशाचा पंतप्रधान बनविले. देवाने योसेफाला पंतप्रधान बनन्यासाठी प्रशिक्षित केले होते त्याच्या भल्यासाठी नव्हे तर सर्वांच्या भल्यासाठी.

दुष्काळ इतका भयंकर होता कि सर्वत्र लोक भूकेले होते, योसेफाचे कुटुंब देखील. ज्या भावांनी योसेफाला विकले होते त्यांना आता योसेफाने अन्न दयावे अशी वेळ आली होती! परंतू त्यांनी त्याला ओळखले नाही ते बदलले कि नाही हे तपासण्यसाठी त्याने त्यांची परीक्षा घेतली. योसेफाने आपल्या भावांची क्षमा केली आणि त्यांना देशातील सर्वात चांगला प्रदेश राहण्यासाठी दिला. जेव्हा आपण देवावर भरवसा ठेवतो तेव्हा आपण इतरांना क्षमा करून त्यांच्याशी चांगले वागू शकतो.

योसेफासारखे, येशूला देखील अन्यायाने वागविण्यात आले. त्यांने काही चूक केली नाही तरी त्याच्यावर चूकीचे आरोप लावण्यासत आले. मग येशूला वधस्तंभावर मारण्यात आले! योसेफासारखेच, त्याने हया सर्व गोष्टीच्या बाबतीत देवावर भरवसा ठेवला. योसेफ पंतप्रधान बनला परंतू येशू संपूर्ण विश्वाचा राजा झाला! देव आपल्याला कठिण प्रसंगातून जातांना त्याच्यावर भरवसा ठेवायला सांगतो आणि तो त्या परिस्थितीत आपल्या बरोबर राहण्याचे अभिवचन देतो. वचन सांगते कि जे त्याच्यावर प्रिती करतात त्यांच्या साठी सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात. (रोम 8:28) त्याच्या मनात जे आहे त्याच्यासाठी तुमची तयारी करण्यासाठी तुम्ही देवाला कठिण प्रसंग वापरू द्याल का?

परिस्थिती कठिण असली तरी मी माझया जीवनासंबंधी देवावर भरवसा ठेवण्याची निवड करतो.


## निर्णय 8

नंतर तिचा मित्र बझला पेपीला काय झाले ते समजले. तो तिच्याशी बोलला आणि त्याने तिची खात्री पटवून दिली कि ख्रिस्ती लोकांच्या जीवनात आज्ञाधारकपणा हा गुण असला पाहिजे. कदाचीत तिच्या शिक्षकांना तिचा आवाज ऐकू आला नसेल म्हणून तिचा गृहपाठ पूर्ण झााला तेव्हा त्यांनी तिला उत्तर दिले नाही. पेपीच्या लक्षात आले कि तिची वृत्ती योग्य नव्हती, आणि तिने चांगले काम करणे सुरू ठेवले.



## कृती 8

**आत्मविश्वास दैनंदिनी**



हया आठवडयात देवावर कसा विश्वास ठेवावा हे लिहिण्यसाठी मुलं दैनंदिनी लिहितात. प्रत्येक मुलाला कागदाचे दोन चैथे भाग दया. मुलं कागदं एकत्र करून ते दुमडतील आणि पुस्तक तयार करण्यसाठी मध्ये पिन लावतील. ते कव्हरला सजवितील.

हया आठवडयात ते दररोज देवावर कसा भरवसा ठेवू शकतात हे लिहितील. पहिला दिवस वर्गात लिहुन त्यांची मदत करा.

## काल रेखा 8


योसेफाच्या जीवनासाठी रेखा काढा

प्रश्नः योसेफाचा जन्म झाला तेव्हा याकोब किती वर्षाचा होता? उत्तरः निश्चित वेळ नाही, परंतू असे मानले जाते कि योसेफ 100 वर्षाचा होता.

प्रश्नः योसेफ किती वर्ष जगला? उत्तरः110 वर्ष

## कोडे उत्तर 8

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| रं | मि | स | स्त्र | भा | वि | ही |
| ग | स्त्र | ब | र्शी | रो | ऊ | रं |
| रं | फा | द | वि | क | णे | से |
| ऊ | प्न | ला | द्वे | ही | फा | रो |
| स्व | ही | ऊ | दा | प्न | र | श |
| यो | ज | ना | ब | स | ग | क |
| णे | से | भा | मि | व | त्र | ता |
| पु | त्र | फ | ग | स्त्र | द्वे | यो |
| स्व | प्न | रं | र्शी | ही | ष | ज |
| अ | ब्रा | हा | मा | ने | ग | ग |






## प्रश्न उत्तर 8


1. अशा काही गोष्टी आहेत का की देव करू शकत नाही? ( नाही पवित्र शास्त्र सांगते कि देव सर्व समर्थ आहे. तो सर्व काही सांगू शकतो आणि काळाच्या सुरवाती पासून तर आता पर्यंत आणि भविष्यातही सर्व गोष्टी त्याला समजतात)

2. देव आपल्या बरोबर वाईट गोष्टी का होवू देतो? (योसेफाच्या बाबतीत, देवाने घडलेल्या वाईट गोष्टींचा उपयोग त्याला ज्या ठिकाणी देव नेऊ इच्छित होता तिथे नेण्यासाठी आणि त्याला प्रशिक्षित करण्यासाठी केला. देव आपल्या आत्म्याची अधिक पर्वा करतो, पुष्कळशा वाईट गोष्टी आपल्यासाठी वाईट नसतात, परंतू आपल्या भल्यासाठी असतात. हे लक्षात घेणे देखील चांगले आहे कि ज्या जगात आपण राहतो त्यात भरपूर पाप आहे आणि देवाने सैतानाला पृथ्वीवर फिरण्याची मूभा दिली आहे. म्हणून मरण, लढाई, भूमीकंप, आपत्ति, आणि लोक करित असलेल्या अनेक वाईट गोष्टी आहेत आणि त्या विश्वासणारे आणि अविश्वासणारे हया दोघांवरही प्रभाव करतात.)

3. इतर धर्म का चांगले नाहीत? (पवित्र शास्त्र सांगते कि तारणाचा एकमेव मार्ग येशू ख्रिस्त आहे. तुम्ही देवाबरोबर योग्य संबंधात येण्यासाठी काय करावे असे इतर धर्म सांगतात?)

## खेळ 8

**दोरी**




- तीन वेगवेगळया झाडांना दोरी बंधा किंवा खांबाला कमीत कमी एक मिटर दुर आणि त्याच्या वर 1,2,आणि 3 अशी खून लावा.
- सहा खून लावणारे घ्या. (तुमच्या वर्गात किती मुलं आहेत हयानुसार) जे इतरांना खूण लावण्याचा प्रयत्न करतील.
- इतर मुलं झाडांपासून 10 मिटर अंतरावर उभे राहतील. इतरांच्या मध्ये आणि झाडांमध्ये सहा खूण लावणारे टाका.
- जेव्हा शिक्षक म्हणतील, ‘दोरी घ्या’ तेव्हा सर्व मुलं खुण लावणा-या मुलांना स्वतःला हात न लावू देता दोरी पकडतील. ज्या कोणाला हात लावला जाईल तो तिथे गोठेल.
- जर तो दोरी कडे पोहचला आणि तिथे आधीच मुल आहे तर त्यांनी रांग मोठी करण्यासाठी मुलाचा हात पकडावा. जे मुलं दोरी पकडतात किंवा जे मुलं दोरी पासून सुरू झालेल्या रांगेत आहेत त्यांचा हात पकडतात ते सुरक्षित आहेत आणि गोठू शकत नाहीत.
- जेव्हा सर्व जण जुळतील किंवा गोठतील, तेव्हा शिट्टी वाजवा आणि खेळ पूढे सुरू ठेवा. शिक्षक 2 किंवा 3 नंबर म्हणतील आणि जे मुलं रस्सीला जुळले आहेत त्यांनी त्याची रस्सी सोडावी आणि पकडले न जाता दुसरी रश्शी पकडावी. हया वेळी जे गोठलेले मुलं आहेत ते सुध्दा धावू शकतात. मुलांना पुन्हा धावण्याची संधी देण्याआधी पकडणारे सहा मुलं सहा पावले मागे जातील.
- शिक्षक कधीच एक नंबर म्हणणार नाही कारण जेव्हा सर्व मुलं एक नंबरवर राहतील किंवा गोठतिल तेव्हा खेळ संपेल.

- जो पर्यंत मुलांच्या हे लक्षात येत नाही कि ते एक नंबरच्या रश्शीवर भरवसा ठेवू शकतात आणि सर्व आधी तिथे धावत नाही तो पर्यत खेळा.
- मुलांना विचारा कि 2 आणि 3 रिकामी असतांना सर्वजण 1 कडे का धावत आहेत.
- हे देवावर भरवसा ठेवण्यासारखे का आहे हया बद्दल विचार करा. तो नेहमी विश्वासू आहे आणि जर आपण सर्वप्रथम त्याच्याकडे धावतो तर आपल्याला पुन्हा धावण्याची गरज पडणार नाही.

## हजेरी 8




वर्गात हजर राहण्यासाठी मुलांना त्यांचे आजचे कार्ड द्या. त्यांचे अभिनंदन कराआणि त्यांना दुसरे कार्ड घेण्यासाठी पुढील आठवड्यात येणास प्रोत्साहित करा जेणेकरून ते वीर खेळ खेळू शकतील! आजचे कार्ड आहे:

**योसेफ**

## गृहपाठ 8

**कार्य**

हया आठवडी तुमचा गृहपाठ लोकांना क्षमा करणे आहे. आपण सर्वांनीच अयोग्य वागणूकिचा सामना केला आहे. आपण त्याबद्दल रागावतो आणि त्याचा सूड घेवू इच्छितो किंवा आपण क्षमा करून देवावर भरवसा ठेवण्याची निवड करू शकतो. हया आठवडी जेव्हा कधी तुम्ही असा विचार करता कि कोणीतरी तुम्हाला दुखावल आहे तेव्हा असा विचार करा कि 'मी त्यांची क्षमा करतो' तुम्हाल हे त्या व्यक्तिला जाउन म्हणायचे नाही, तुम्ही एकटे असतांना तुम्ही ते जोराने म्हणू शकता. हया मुळे जो राग तुमच्या मनात आहे त्यातून तुमची सुटका होवू शकते आणि तुम्ही पुन्हा एकदा आनंदी व्हाल. तुम्ही तुमच्या स्वर्गीय पित्या सारखे आहात कारण तो आपणा सर्वांची क्षमा करतो. जितके ज्यास्त तुम्ही लोकांची क्षमा कराल तितके तुम्ही स्वतंत्र व्हाल.

**वाचा**

दिवस 1: निर्गम 3:2-10

दिवस 2: निर्गम 7:10-11, 20-21, 8:6-8, 16-22

दिवस 3: निर्गम 9:2-3, 6-19, 10:3-5, 21-23

दिवस 4: निर्गम 11:4, 12:12-14, 29-30

दिवस 5: निर्गम 14:5-9, 13, 21-27

# 9. पापाला मागे सोडा



**योसेफ: मोशे**

निर्गम 1:1-2:15, 3:1-12, 4:10-17, (7:8-13:42), 14:5-31, प्रेषितांची कृत्ये 7:20-34, इब्री 11:23-29

## पाठांतर वचन 9

2 तीमथ्याला 2:21 “म्हणून जर कोणी त्यांपासून दूर राहून स्वत:ला शुद्ध करील, तर तो पवित्र केलेले, स्वामीला उपयोगी पडणारे, प्रत्येक चांगल्या कामास तयार केलेले, असे मानाचे पात्र होईल.”

## आवश्यकता गोष्ट 9



कामेटची आई जेवण तयार करत होती आणि तिला लगेच अंडे हवे होते म्हणून तो दुकानाकडे धावत होता. तो दुकानात आला आणि मोठयाने ओरडला, परंतू तिथं कोणीच नव्हतं. मग त्याने पाहिले कि वर काही पैसे होते. असं दिसत होतं कि कोणीतरी ते तिथे विसरले होते. परंतू आजूबाजूला कोणीच नव्हते म्हणून त्याने त्या पैश्याकडे पाहिले आणि त्याने ते घेतले.

## मुख्य धडा 9

याकोबाचे कुटुंब इस्त्राएल राष्ट्र बनले. परंतू मिसरी लोकांनी त्यांना गुलाम बनविले आणि फारोने त्यांच्या मुलांना मारण्याचा निर्णय घेतला. एका इस्त्राएली मातेने तिच्या मुलाला निल नदीत एका टोपलीत टाकले. फारोच्या मुलीने त्याला दत्तक घेतले आणि त्याचे नाव मोशे ठेवले. मोशेने मिसर देशातील राजघराण्यातील जागा सोडुन देवाच्या लोकांचा भाग होण्याचा निर्णय घेउन देवावरील विश्वास प्रगट केला. त्याची इच्छा होती कि इस्त्राएल लोकांना सोडवावे, परंतू पाप मध्ये आले. एका दिवशी मोशेने इस्त्राएली व्यक्तिला मारल्या बद्दल एका मिस-याला मारून टाकले. परंतू मोशेच्या मनात आणखी एक पाप होतेः गर्व. मोशेने विचार केला कि तो त्याला पाहिजे तसे इस्त्राएल लोकांना सोडवू शकतो. पवित्र शास्त्र सांगते कि देव गर्विष्टांचा विरोध करतो आणि दिनांना कृपा पूरवितो. ज्या रितीने देवाने योसेफाच्या मनात कार्य केले तसेच देवाने मोशेच्याही मनात कार्य करण्याची गरज होती. मोशेला पकडण्यात आले आणि त्याला त्याचा

40 वर्षानंतर, देव आला आणि त्याच्या बरोबर एका जळत्या झुडपातुन बोलला, ते झुडुप जळत होते परंतू भस्म होत नव्हते. देवाने मोशेला सांगितले कि तू परत जा, परंतू हया वेळेस देव इस्त्राएल लोकांना सोडविल, आणि मोशू देवाच्या सांगण्याप्रमाणे करेल. मोशेच्या लक्षात आले कि तो इस्त्राएल लोकांना सोडवू शकत नव्हता, आणि तो बोलू शकत नव्हता आणि लोकांचे पुढारीपण करण्यात कमजोर होता. परंतू तो परिपूर्ण होते! देव सहसा आपण ज्या क्षेत्रात चांगले नाही त्याचा उपयोग करतो हया साठी कि हे स्पष्ट दिसेल कि देव आपल्याद्वारे कार्य करत आहे.

आज हया आधी आपण ऐकले कि कौमेट दुकानातील पैसे चोरत होता. जेव्हा कौमेट  चोरी करतो तेव्हा देव त्याचा उपयोग करू शकत नाही. जर आपण पश्चाताप करतो आणि आपला गर्व आणि पाप दुर करतो तर देव आपला

उपयोग करू शकतो. मग जेव्हा देव बोलावितो तेव्हा आपण घाबय नये कारण आपल्याला माहित आहे कि आपल्या द्वारे देव त्या गोष्टी करेल.

मिसर देशात, देवाने इतिहासातील देवाच्या सामर्थ्याचे सर्वात मोठे प्रदर्शन करत मोशेचा उपयोग इस्त्राएल लोकांना सोडविण्यासाठी केला. देवाने दहा पिडा आणल्याः पाण्याचे रक्त केले, उवा, माशा, पशूचे मरणे, गळवे, टोळ, अंधकार, आणि शेवटी प्रथम जन्मलेल्यांचे मरण. शेवटच्या पिडेत, देवाने इस्त्राएल लोकांना सांगितले कि त्यांनी खाण्यासाठी कोकरू मारावे आणि ते रक्त दाराच्या कपाळ पट्टीवर लावावे. प्रत्येक घर जे आज्ञा पाळेल त्यांचे प्रथम जन्मलेले वाचतील. हे येशू आपल्या पापासाठी कोकरा म्हणून मरणार हया गोष्टीचे चित्र होते. अनेक लोक येश्जूवर विश्वास ठेवून, पश्चाताप करू आणि त्याचे वचन पाळण्या ऐवजी स्वतःला स्वतःच्या प्रयत्नानी वाचविण्याचा प्रयत्न करतात. तुम्ही देवाच्या मार्गाची निवड कराल का?

इस्त्राएल देवाच्या मागे तांबडया समुद्रपर्यंत गेले आणि मिस-यांनी त्यांचा पाठलाग केला! मोशेने इस्त्राएल लोकांना सांगितले कि त्यांना घाबरण्याची गरज नाही देव त्यांच्यासाठी भाडेल आणि त्यांना वाचविल. मग देवाने तांबडा समुद्र दुभागला आणि इस्त्राएल लोक पाण्याच्या दोन भिंतींच्या मधून कोरडया जमीनीवरून गेले परंतू मिसरी लोक मात्र बुडाले. मोशेने पूर्ण आज्ञापालन करित नम्रतेने त्याच्या पुढील जीवनभर इस्त्राएलांचे नेतृत्व केले.

मी माझया पापासाठी पश्चाताप करून देवापूढे शुध्द राहण्याची निवड करतो.

## निर्णय 9



कौमेट कडे चांगले काम करून दुकानात पैसे परत करण्याची संधी होती. तो त्याच्याबद्दल विचार करत राहीला, मग त्याचा मित्र पेपी ज्याच्याकडे खूप प्रामाणिकपणा होता तो त्याच्या कडे आला. कौमेट म्हणाला मला तुझी गरज होतीच. त्याच्या मित्राच्या मदतीने त्याने पैसे परत करून योग्य ती गोष्ट केली.

## कृती 9

**गोष्ट सांगा**



मासिकातले लोकांचे, जागेचे आणि वस्तूचे चित्र कापून वर्गात आणा (अयोग्य चित्र टाळा) मुलांना 2 किंवा अधिक संघात विभागा. प्रत्येक संघ कापलेले चित्र वापरून पाप पश्चाताप आणि नविन जीवनाचा समावेश असलेली गोष्ट सांगेल.

## काल रेखा 9

मोशेच्या जीवनाची रेष काढा

प्रश्नः योसेफापासून तर मोशेच्या जन्मापर्यंत किती दिवसांचा कालावधी होता? उत्तरः आपल्याकडे नेमकी वेळ नाही, परंतू सुमारे 380 वर्ष.

प्रश्नः मोशे किती काळ जगला? उत्तरः120 वर्ष

## खेळ 9

**दहा आज्ञा**




- हया कार्यासाठी तुम्हाला दहा अंडे, स्वच्छ करण्याचे कापड आणि एक स्वयं सेवक लागेल जो घाण होण्यासाठी तयार आहे..
- दहा च्या प्रत्येक आज्ञे साठी त्यामुलाला एक अंडं पकडायला लावा. अंडे धरण्यासाठी वेगवेगळया प्रकाराचा उपयोग कराः त्याच्या हातात, त्याच्या पायावर, गुडघ्यांच्या मध्ये, बगलेत, त्याच्या तोडांत इ.
- प्रत्येक वेळेस अंडे पडू न देणे अधिकाधिक कठिण होईल. शेवटी, 10व्या अज्ञेच्या वेळेस अंडे त्याच्या डोक्यावर ठेवा.
- खेळाच्या वेळेस आज्ञा बद्दल बोले आणि एक पाळणे किती सोपे आहे आणि दहा पाळणे किती कठिण ते सांगो. उदा. 6साठी तुम्ही म्हणा, कोणाचा खून करणे सोपे नाही म्हणून अंडे सोप्या जागेवर ठेवा (मुलांना ओरडू दया कि अंडे कुठे ठेवायचे) मुद्दा हा आहे कि मुलांना हे दाखवावे कि आपण सर्वांनी पाप केले आहे आणि आपण अंडे पाडले आहेत.
- शेवटी अंडे मुलांच्या डोक्यावर फोडा. अंडे दगडाने, मुलांच्या नकळत फोडा. मुलांच्या डोक्याला दगड मारू नका. मुलाला कळू दया कि तो केव्हा घाण होणार आहे. हा फार सामर्थ्यशाली दुष्य धडा आहे.


**दहा आज्ञा**

1. दुसरे देव करू नकोस.
2. मूर्ती करू नको व तिच्या पाया पडू नको
3. देवाचे नाव व्यर्थ घेवू नको
4. विश्रामाचा दिवस वेगळा ठेव
5. आपल्या आईवडीलांचा मान राख
6. खून करू नको
7. व्यभिचार करू नको
8. चोरी करू नको
9. खोटी साक्ष देवू नको (कोणाला त्रासात पाडण्यासाठी खोटं बोलणे)
10. लोभ करू नको

## कोडे उत्तर 9

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ढ | सो | र | फा | रो | प | प |
| तां | स | डू | मि | डा | र | र |
| मि | ब | मु | न | स | मे | मे |
| अ | ग्नी | डा | णे | जा | र | श्व |
| मि | ठी | घे | स | स | ने | र |
| झु | व | मि | मि | मु | मो | शे |
| जी | डू | ठी | द्वे | मे | द्र | डा |
| ढ | का | प | ष | ग | पी | द्र |
| मि | स | रं | ढ | आ | ग्नी | रो |



## प्रश्न आणि उत्तर 9


1. जर देव माझी क्षमा करतो तर मी पाप केले तर काय फरक पडतो? (रोम 7 चा प्रश्न. देव क्षमा करतो म्हणून पाप न करण्या बद्दज सावध का असावे? पाप नेहमी देवा विरूध्द आहे आणि त्याची शिक्षा झालीच पाहिजे. येशू आपल्याला क्षमा करतो परंतू पापाचे परिणाम नेहमीच असतात. उदा. जर मी वर्गात चूकीचे वर्तन केले तर, देव मला क्षमा करेल परंतू मला शिक्षा मात्र होईल)

2. जर एखादी व्यक्ति खूप खूप वाईट आहे तर काय? (हया प्रश्नामागील कल्पना अशी आहे कि मुलांना हे समजण्यासाठी मदत करावी की देव मोठया पापांची क्षमा करतो परंतू आपण तरी सुध्दा प्श्चाताप करून क्षमा मागितली पाहिजे. आणखी जर आपण इतरांना खूप दुखावतो तर आपण तुरूंगात सुध्दा जावू शकतो, जरी देव

आपल्याला क्षमा करत असला तरी. मादक पदार्थ, हिंसा किंवा लैगिकता हयागोष्टी सारख्या गोष्टी आपल्या नको त्या प्रकारे आपले संपूर्ण भविष्य बदलू शकतात.)

3. मी जर काहीतरी चांगले करण्याचा प्रयत्न करतांना काहीतरी चूकीचे केले तर ठिक आहे का? (हे युध्द आपले हेतू आणि आपल्या कृती हयाच्यात आहेत. देव आपल्या हेतूंबद्दल चिंता करतो, परंतू पौल विचारतो, 'चांगले परिणाम प्राप्त व्हावे म्हणून आपण पाप करतच रहावे का?' उत्तर आहे, 'नक्कीच नाही' रोम 3:5-8)

## हजेरी 9




वर्गात हजर राहण्यासाठी मुलांना त्यांचे आजचे कार्ड द्या. त्यांचे अभिनंदन कराआणि त्यांना दुसरे कार्ड घेण्यासाठी पुढील आठवड्यात येणास प्रोत्साहित करा जेणेकरून ते वीर खेळ खेळू शकतील! आजचे कार्ड आहे:

**मोशे**

## गृहपाठ 9

**कार्य**

तुमचे कार्य हे आहे की जेव्हा तुम्ही पाप करता तेव्हा काय प्रतिक्रिया देता, जसे ते लपविणे किंवा त्या बद्दल खोटे बोलणे, आणखी एक पाप. कधी कधी आपण असे म्हणून स्वतःला शिक्षा देतो कि,'मी चांगली व्यक्ति नाही आणि मला हे किंवा ते करण्याची परवांगी नसावी.' आणि आपण निराश होतो. परंतू सर्वात चांगली प्रतिक्रिया म्हणजे हे मान्य करणे कि आपण पाप केले आहे आणि येशूला त्या पापाची क्षमा मागणे. देवाची इच्छा नाही कि आपण आपल्या पापाबद्दल निराश व्हावे. तो तुम्हाला क्षमा करू इच्छितो, जेणे करून तुम्ही इतरांना प्रोत्साहन देण्यासाठी मोकळे व्हाल.

**वाचा**

दिवस 1: गणना 13:1-3, 17-25

दिवस 2: गणना 13:26-33

दिवस 3: गणना 14:1-9

दिवस 4: गणना 14:10-16

दिवस 5: गणना 14:17-24

# 10. होय तुम्ही करू शकता



**वीर: कालेब**

गणना 13:1-3, 13:17-14:9, 14:7-24, 14:30-45

## पाठांतर वचन10

प्रेषितांची कृत्ये 1:8 “परंतु पवित्र आत्मा तुमच्यावर येईल तेव्हा तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल, आणि यरुशलेमेत, सर्व यहूदीयात, शोमरोनात व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल.”

## आवश्यकता गोष्ट10



रविवार शाळेत पेपी शिकली कि देवाची इच्छा आहे कि आपण आपल्या विश्वासाबद्दल सांगावे जेणे करून इतर मुलं येशूवर विश्वास ठेवू शकतील. सोमवारी ती सुट्टी नंतर वापस जात होती तेव्हा पेपीने एका मुलीला एकटीच बेंचवर बसलेले पाहिले. वर्गात जातांना ती तिची मैत्रीण कौमेट हिला म्हणाली, ‘तू बेंचवर बसलेली ती मुलगी पाहिली काय? मी खात्रीने सांगू शकते ती एकाकी आहे. कौमेट म्हणाली, ‘हे कदाचीत तू तिला प्रोत्साहन देउ शकते. किंवा तू तिला येशू बद्दल सांगू शकते आणि तिला मंडळीत बोलावू शकते जेणे करून ती या पूढे एकाकी राहणार नाही.’ पेपी म्हणाली,‘पण मी काय करू शकते? तिला काय म्हणावे मला माहित नाही. आणि माझे इतर मित्र माझया बद्दल काय विचार करतील?’

## मुख्य धडा 10

शेकडो वर्षानंतर, देव आब्राहाम, इसहाक आणि याकोब हयांना दिले वचन पूर्ण करित होता व इस्राएल लोकांचे नेतृत्व करीत होता. देवाने मोशेला सांगितले कि त्याने वचनदत्त देशात बारा हेर पाठवावे. ते असे म्हणत परत आले कि त्या देशात दूध, मध आहे आणि द्रक्षाचे घडं तर इतके मोठे होते कि त्यांना काठीवर ठेवून दोन व्यक्ति उचलण्यासाठी लागतात. परंतू 10 हेर म्हणाले तिथले लोक खूप मोठे आहेत आणि ते तो देशे जिंकू शकणार नाहीत. एक हेर कालेब हयाने त्यांना थांबविले आणि तो म्हणाला, ‘आपण ते करू शकतो.’ त्याने विश्वास ठेवला कि समर्थ देव त्यांना मदत करेल. देवाल अशा प्रकारचा विश्वास आवडतो.

परंतू लोकांनी इतर हेरांवर विश्वास ठेवला, ते भितीने कुरकुरले आणि त्यांनी जाण्याचे नाकारले. देव त्यांच्यावर रागावला आणि त्या 10 लोकांची शिक्षा मरण होती! सं्पूर्ण इस्त्राएल राष्ट्राची शिक्षा वाळवंटात भटकणे होती. जेव्हा त्यांनी आज्ञा मोडली तेव्हा ते सहज हारले कारण देव त्यांच्या बरोबर नव्हता. 40 वर्ष भटकल्यानंतर त्या पिढीतील जे लोक त्यांच्या बरोबर उरले ते म्हणजे कालेब आणि यहोशवा म्हटलेला दुसरा हेर. त्यांच्या विश्वासाचे बक्षीस म्हणजे देवाने त्यांनी पाहिलेला देश त्यांना दिला.

हया आधी आज आपण पाहिले कि पेपी घाबरत होती परंतू कौमेट  त्याच्या विश्वासासंबंधी धर्यैवान होता आणि त्याने पेपीची मदत केली. जेव्हा आपण आपल्या विश्वासासाठी उभे राहतो आणि जे अशक्य त्याच्यासाठी त्याची आज्ञा पाळतो तेव्हा देवाला आनंद होतो. तुमच्या जीवनासाठी देवाकडे एक योजना आहे आणि ती तुमच्या कल्पने पलिकडे आहे जर तुम्ही होय म्हटले तर.

येशूने म्हटले जर तुमच्या ठायी मोहरीच्या दाण्याऐवढा विश्वास असला तर तुम्हाला डोंगर हलविता येतील. (मत्तय 17:20) आपण आपल्या मंडळीतील पुढा-यांचे अनुसरण आणि सेवा करून आपला दाण्याएवढा विश्वास वाढवू शकतो. यहोशवा हा मोशेचा वयैक्तिक सहकारी होता (निर्गम 24:13)मोशे निवासमंडपात देवा बरोबर बोलायला जात असे, परंतू जेव्हा तो जाई तेव्हा यहोशवा देवाबरोबर एकटाच मंडपात राहत असे (निर्गम 33:11) आपण सुध्दा देवाबरोबर वेळ घालवितो, शास्त्रवाचन, प्रार्थना आणि त्याच्या साठी गाणे गाउन केवळ इतरांबरोबर असतांनाच नव्हे तर जेव्हा आपण एकटे असतो तेव्हा सुध्दा. देवाने पवित्र शास्त्रात आणि आपल्या जीवनात ज्या गोष्टी केल्या त्या आपण लक्षात ठेवू शकतो. कालेब आणि यहोशवाने मिसर देशात देवाचे चमत्कार पाहिले. ज्या रितीने यहोशवाने कालेबची साथ दिली त्याच रितीने आपणही आपल्याला प्रोत्साहन देणारे मित्र निवडू शकतो. या विरूध्द संपूर्ण इस्त्राएल लोकांनी ज्या लोकांनी विश्वास ठेवला नाही त्यांची साथ दिली. जर मित्राचा अविश्वास तुमच्या वर प्रभाव टाकतो तर तुम्ही स्वतःला त्याच्या पासून दुर न्यावे व अशा मित्रांबरोबर वेळ घालवावा जे विश्वास ठेवतात. तुमच्या विश्वासावर कार्य करा हयासाठी कि जेव्हा देव तुम्हाला बोलावितो तेव्हा तुम्ही केवळ त्याची आज्ञाच पाळू नये तर त्याने तुमच्यासाठी ठेवलेले सुंदर जीवन जगावे आणि इतरांनाही तसेच करण्यासाठी प्रोत्साहित करावे.

मी देवाला होय म्हणण्याचा स्वीकार करतो. प्रभू मी माझया जीवनाचे सूत्र तुला देतो, तुला जे पाहिजे ते कर, मोठे, लहान किंवा धोकादायक. माझे जीवन तुझे आहे. मला भितीविना किंवा कुरकुर न करता तुझयासाठी जगण्यास मदत कर. कृपाकरून माझयासाठी तुझया कडे असलेल्या महान योजना पाहण्यासाठी माझे डोळे उघड. आभार मानतो.

## निर्णय 10



जेवणाच्या वेळेस, ‘कौमेट म्हणाला, मी तुझया बरोबर गेलो तर? आपण त्या मुलीच्या बाजूच्या टेबलावर बसू. मला देखाल माहीत नाही कि काय बोलावे परंतू कदाचीत देव आपल्या दोघांनाही तिच्याबरोबर कृपाळू होण्यासाठी मदत करिल.’ पेपी आनंदी होती कि कौमेट तिचा मित्र होता आणि त्या मुलीबरोबर तिचा विश्वास वाटण्यासाठी तिची मदत करू शकत होता. त्या मुलीच्या घरी समस्या होत्या आणि नवीन मैत्री जोडणे आणि हे शिकणे कि येशू तिच्यावर प्रिती करतो हया मूळे तिला बरेच चांगले वाटणार होते.

## कृती 10

**देवाला पत्र**



हया कार्यात, वर्गातील प्रत्येक मुल देवाला पत्र लिहिल आणि सांगेल कि देवाने त्यांच्या जीवनात काय करावे अशी त्याची इच्छा आहे. देव मोठा आहे, मुलांना मोठे स्वप्न पाहण्यासाठी प्रोत्साहित करा. मुलांना हया विनंतीसाठी पूर्ण आठवडा घरी प्रार्थना करू दया आणि जर त्यांच्या मनात येतात तर त्यात आणखी गोष्टी लिहू दया.


## काल रेखा 10

प्रश्नः जेव्हा कालेबचा जन्म झाला तेव्हा मोशे किती वर्षाचा होता? उत्तरः आपल्याकडे नेमके वय नाही परंतू असे मानल्याजात कि मोशे 40 वर्षाचा होता.


प्रश्नः कालेब किती वर्ष जगला? उत्तरः आपल्याकडे नेमकी वेळ नाही परंतू असे मानल्याजाते कि तो 110 वर्ष जगला.

## कोडे उत्तर 10

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वा | च | न | कु | न | णे | दे |
| दे | वं | हो | दू | र | म | न |
| ध | श | य | क | ळ | कु | हे |
| व | च | न | हो | वं | लो | र |
| श्ध | म | फा | रो | श | कं | श |
| न | दू | भु | शि | क्षा | वा | का |
| कु | क्ति | ध | दू | चा | गं | ले |
| हे | म | कु | र | कु | रं | ब |
| य | हो | श | व | क | र | णे |



## प्रश्न आणि उत्तर 10



1. देवाने तुम्हाला कोणत्या कठिण गोष्टी करायला सांगितले आहे? (त्यांच्या जीवनातील वेगवेगळया परिस्थितीबद्दल मुलांबरोबर बोला)

2. जर मी देवाने मला जे करायला लावले ते केल्यामूळे स्वतःचे नुकसान केले किंवा कठिण परिस्थितीत गेलो तर काय? (अनेकांनी देवाची आज्ञा पाळल्यामूळे त्यांचे जीवन गमाविले आहे, म्हणून कितीही कठिण का असेना, देवाची आज्ञा न पाळणे हया पेक्षा त्याची आज्ञा पाळणे अधिक चांगले आहे.)

3. मी देवाचा आवाज ऐकला हया खात्री मी कशी करावी? (हया सूचविलेल्या 3 नियमांच्या आधारे तुम्ही कोणताही निर्णय तपासू शकता. 1. पवित्र शास्त्रः तुम्ही हे पाहता का कि ती पवित्र शास्त्रातील चांगले गोष्ट आहे? 2. माझे अधिकारीः माझे आईवडील, माझे पाळक काय म्हणतात, 3. माझा आत्माः पवित्र शास्त्र म्हणते कि आपण मेंढरे आहोत आणि त्याची वाणी ऐकू शकतो. आपण जेव्हा एखादी गोष्ट करावी कि करू नये हयाबद्दल शंकेत असतो तेव्हा आपण आपला स्वतःचा आवाज ऐकणे शिकले पाहिजे. हे नियम पाळल्याने आपण हा निर्णय घेवू शकतो कि ती देवाची वाणी आहे, आपण अशक्य वाटत असले तरी आज्ञा पाळली पाहिजे.)

## खेळ 10

**कोण गायब झालं?**



- मुलं गोलात बसून त्यांचे डोळे बंद करू शकतात..
- शिक्षक एका मुलाला स्पर्श करतात, जो लपण्यसाठी जातो.
- कोण गायब झाला हे ओळखण्यासाठी सांगा.
- पर्यायः तुम्ही गोलाच्या मध्ये वेगवेगळया वस्तू ठेवू शकता. मुलांचे डोळे बंद असतांना, शिक्षक त्यातील एक हालवतात आणि मुलांनी ओळखावे कि कोणती वस्तू काढली गेली आहे.

## हजेरी 10




वर्गात हजर राहण्यासाठी मुलांना त्यांचे आजचे कार्ड द्या. त्यांचे अभिनंदन कराआणि त्यांना दुसरे कार्ड घेण्यासाठी पुढील आठवड्यात येणास प्रोत्साहित करा जेणेकरून ते वीर खेळ खेळू शकतील! आजचे कार्ड आहे:

**ऐतिहासिक पुस्तकं**

## गृहपाठ 10

**कार्य**

हया आठवडयात तुमचे कार्य देवाने तुमच्यसाठी केलेल्या पाच चांगल्या गोष्टी लिहिणे आहे. मग हया गोष्टीचा विचार करा कि तुमच्या जीवनात कोण हयाशी सहमत होईल कि हया गोष्टी चांगल्या आहेत. त्या लोकांबरोबर तुम्ही ज्यास्त वेळ घालवावा. तुम्ही त्या मित्राबरोबर अधिक वेळ कसा घालवू शकता या बद्दल विचार करा. तुमच्या कडे आधीच काही विश्वास आहे. यामूळे आपल्या विश्वासाला मदत होईल, ज्या रितीने झाडाला पाणी दिल्याने मदत होते तसे.

**वाचा**

दिवस 1: गणना 22:1-8

दिवस 2: गणना 22:9-17

दिवस 3: गणना 22:18-25

दिवस 4: गणना 22:26-33

दिवस 5: गणना 22:34-41

# 11. त्याच्या बद्दल विचार सुद्धा करू नकोस



**पवित्र शास्त्रातील गोष्ट: बलाम**

गणना 22:1-6, 22:9-38, 23:13-21, 24:10-13

## पाठांतर वचन 11

इफिसकरांस पत्र 6:1 “मुलांनो, प्रभूमध्ये तुम्ही आपल्या आईबापांच्या आज्ञेत राहा, कारण हे योग्य आहे.”

## आवश्यकता गोष्ट 11



बझ शहरातील होत असलेल्या एका सभेला जावू इच्छित होता. तो त्याचा गृहपाठ संपविण्याची आणि आईला घर स्वच्छ करण्यासाठी मदत करण्याची घाई करत होता. ते संपल्यावर त्याने आईला म्हटले, आई मला सभेला जाण्याची परवांगी आहे का?’ त्याच्या आईने त्याला म्हटले,‘आज दुपारी शक्य होणार नाही आम्ही बाहेर जाणार आहोत आणि आमची इच्छा आहे कि तु घरी थांबावे.’ बझ दुःखी झाला आणि गोंधळला. त्याच्या आईने त्याला परवांगी देवू नये असे कसे होवू शकते? त्याच वेळेस किप त्याचा रविवार शाळेचा सहकारी हयाने त्याला फोन केला आणि विचारले, ‘तु कार्यक्रमाला येणार आहेस काय? आम्ही तुझयासाठी थांबू का?’ त्याने म्हटले नाही, ‘मी येवू शकत नाही.’ ‘बझ तो कार्यक्रम देवाबद्दल आहे. तू जावू शकतो. देव सर्व गोष्टींपेक्षा महत्वाचा आहे!’

## मुख्य धडा 11

मागील आठवडी, इस्त्राएल 40 वर्ष वाळवंटात फिरले. इस्त्राएल प्रवास करत असतांना ते मवाब देशातून गेले. मवाबी त्यांना घाबरलेले होते, म्हणून त्यांचा राजा बलाक हयाने बलामाला इस्त्राएलला शाप देण्यासाठी बोलाविले. जेव्हा बलामाने देवाला विचारले कि काय करू तेव्हा देवाने त्याला जावू नको असे सांगितले. परंतू बलाक चिडला आणि त्याची इच्छा होती कि त्याने अधिक चांगले राजकुमार आणि बक्षीसं पाठविले. बलामाने त्यांना थांबायला सांगितले आणि देव काय म्हणतो ते तो पाहू इच्छित होता. कधी कधी जेव्ळा आपण देवाशी सहमत नसतो तेव्हा आपण त्याला पुन्हा विचारण्यासाठी मोहात पडतो किंवा त्याला त्याचे मन बदलण्यासाठी जबरदस्ती करतो. देवाने त्याला जावू दिले परंतू तो त्याच्यावर चिडला. कधी कधी जेव्हा आपण देवाला जबरदस्ती करतो, तेव्हा तो आपल्याला पाहिजे ते आणि त्याच्या बरोबर जाणारे परिणाम सुध्दा देतो. बलाम मवाब देशाच्या मार्गावर असतांना, एक देवदूत येउन त्याच्या पूढे थांबला. बलामाला तो दिसला नाही परंतू त्याच्या गाढवाला मात्र तो दिसला. आधी गाढव वळले आणि शेतात गेले, आणि पूढे गेल्यावर त्या गाढवीने बलामाचा पाय भितीत दाबला, मग ती रस्त्यावर बसली. जेव्हा बलाम त्याच्या गाढवीवर चिडला तेव्हा देवाने गाढवीला वाचा दिली! ती म्हणाली,‘ माझयावर का चिडता? मी तुमची विश्वासू गाढवी नाही काय? या आधी मी असे केले काय?’ मग देवाने बलामाला त्याला मारू शकणारा देवदूत दिसू दिला आणि बलामाच्या लक्षात आले कि तो चूक करत आहे. बलामाला कळले कि देवाची इच्छा नाही कि त्याने

इस्त्राएलला शाप दयावा, बलाक राजाकडून त्याला मिळणारे बक्षीस कितीही मोठे असले तरी. जेव्हा ते पोहचले तेव्हा बलामाने इस्त्राएलला चैपट आर्शिवाद दिला आणि हया पूढे देवाची आज्ञा मोडण्याचा विचार सुध्दा केला नाही.

आज आधी आपण बझ बद्दल ऐकले ज्याला त्याच्या आईवडीलांची आज्ञा मोडून सभेला जाण्याचा मोह झाला. जाण्यासाठी वेगवेगळे कारणं देणे त्याच्यसाठी सोपे आहे, जसे किपने त्याला म्हटले कि सभा देवाची होती. परंतू देव आल्याला आपल्या आईवडीलांची आज्ञा पाळण्यासाठी सांगतो, आणि देवाची आज्ञा सभेमूळे बदलणार नाही. येशूने म्हटले कि आपण मोहात पडू नये म्हणून प्रार्थना करित जागृत राहा ... मत्तय 26:41... तुमच्या विचाराकडे लक्ष दया कारण तुम्ही जितका ज्यास्त चूक करण्याचा विचार कराल तितकं ज्यास्त योग्य ते करणं कठिण होईल. देवाचे वचन काय म्हणते हे समजल्याबरोबर त्याचे पालन करण्यासंबंधी तत्पर असा जेणे करून तुम्ही चूक करण्याचा विचार सुध्दा करणार नाही.

मी पटकन देवाची आज्ञा पाळण्याची निवड करतो आणि स्वतःला चूक करण्याचा विचार करण्याची संधी सुध्दा देणार नाही.

## निर्णय 11




त्या क्षणी बझला आठवले कि देवाचे वचन सांगते कि आपण आपल्या आईवडीलांची आज्ञा पाळलीच पाहिजे आणि देवाला आपण आज्ञा पाळलेली आवडते. मग तो म्हणाला,‘ मी जाणार नाही.’ त्याने किपला सांगितले कि वचन काय सांगते कि आपण काय करावे.

## कृती 11

**रबर बेंड आणि रिंग**

वर्गाच्या वेळेस बोटाचा बँड किंवा ब्रेसलेट तयार करा हे आठवडाभर हे लक्षात ठेवण्यासाठी कि आपण देवावर जबरदस्ती करू नये. ते तयार करण्यासाठी कृती पाळा किंवा तुम्ही प्लास्टिरचे रिंग वापरू शकता.




1. रबर बेंड घेउन त्याला अध्र्यातून दुमडा

2. पहिल्या रबर बेंड ने तयार केलेल्या लूप मधून दुसरा घाला.

3. साखळी तयार करण्यासाठी रबर बेंड अध्र्यातून ओढा. आपल्या हवे असलेले माप तयार करण्यासाठी या चरणांची पुनरावृत्ती करा..

4. एकत्र बांधण्यासाठी दुस-या दुमडलेल्या रबरचा उपयोग करा.

## काल रेखा 11

बलामाच्या गाढवीची गोष्ट घडली तो क्षण दाखविण्यासाठी बिंदू काढा.

प्रश्नः देवाचे लोक वाळवंटात भटकू लागले तेव्हा मोशे किती वर्षाचा होता? उत्तरः 80 वर्षाचा

प्रश्नः बलामाने देवाच्या लोकांविरूध्द काम करणे केव्हा सुरू केले? उत्तरः जेव्हा ते वाळवंटात भटकत होते तेव्हा.

## कोडे उत्तर11

पवित्र शास्त्रातील पुस्तकं

पवित्र शास्त्रातील उत्पत्ति ते ऐस्तेर पुस्तकं क्रमाने लिहा.

1.उत्पत्ति
2. निर्गम
3. लेवीय
4. गणना
5. अनुवाद
6. यहोशवा
7. शास्त्रे
8. रुथ
9. 1 शमुवेल
10. 2 शमुवेल
11. 1 राजे
12. 2 राजे
13. 1 इतिहास
14. 2 इतिहास
15. एज्रा
16. नहेम्या
17. एस्तेर

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| प | दि | ला | ले | पु | ली | ब |
| त्र | र | वि | ढ | शा | आ | ला |
| गा | च | मे | त्ति | त | ग्र | व |
| वा | ढ | श | श्व | ळ | ह | भु |
| लो | दे | व | ब | र | प्र | म |
| पु | व | ला | वा | ला | ना | ही |
| त्र | दू | ल | श्व | पु | म | ढ |
| कं | त | ळ | दि | ला | र | लो |
| वा | च | वि | ल | त्र | भु | कं |



## प्रश्न आणि उत्तर 11

1. मी कोणचे ऐकू? (सर्व प्रथम देवाचे, मग हया पृथ्वीवर आपल्या अधिका-यांचे. लक्षात ठेवा आपण जे करणार त्याच्याशी आपले अधिकारी सहमत असतील तर आपण देवाचे अनुकरण करीत आहोत हयाची खात्री असू दया)

2. जर माझया पालकांनी मला काही चुकीचे करण्यास सांगितले तर काय? (आपले पालक कदाचित चूक असतील अशा वेगवेगळया प्रसंगांबददल बोला. मुलांना पालांचा दृष्टीकोन पाहण्यासाठी मदत करा, कारण ब-याच प्रसंगी पालक बरोबर असतात)

3. मग मला कधी बाॅस बनायला मिळेल काय? (माझया अनुभवानुसार ते प्रौढ झाल्यावरही काही वर्ष देव त्यांना एकमेकांची सेवा करण्यास सांगू शकतो. जे विद्यार्थी दानं प्राप्त पुढारी असतात त्यांना देव त्याची सेवा देई पर्यंत थांबायला लावा. उदा. येशू, बारा वर्षाचा असतांना धार्मिक पुढा-यांना आव्हानात्मक प्रश्न विचारत होता, परंतू देवाने त्याला तीस वर्षाचा होई पर्यंत त्याची सेवा सुरू करू दिली नाही)

## खेळ 11

**गाढवला मारू नका**



- एका कार्ड घेउन त्याच्या मध्यभागी गाढव काढा. तलवारीसाठी जागा मोकळी सोडा. गाढवाभोवतीच्या रिकाम्या जागे एवढी तलवार काढा.
- दोन किंवा तीन संघ तयार करा आणि प्रत्येक संघातून एक मूल निवडा
- निवडलेल्या मुलाला तलवार दया आणि त्याच्या संघाचे डोळे बंद करायला सांगा
- संघ मुलाला दिशानिर्देश देईल (उजवी, डावी, वर, खाली) असे ओरडून. ते तलवारीची दिशा कार्ड वरील रिकाम्या जागेवर नेण्याचा प्रयत्न करतील आणि गाढवाला स्पर्श होवू देणार नाही.
- प्रत्येक संघ खेळतो आणि जिंकणारा संघ निवडला जातो.

## हजेरी 11

वर्गात हजर राहण्यासाठी मुलांना त्यांचे आजचे कार्ड या. त्यांचे अभिनंदन कराआणि त्यांना दुसरे कार्ड घेण्यासाठी पुढील आठवड्यात येणास प्रोत्साहित करा जेणेकरून ते वीर खेळ खेळू शकतील! आजचे कार्ड आहे:

**परमेश्वराची तलवार**




## गृहपाठ 11

**कार्य**

हया आठवडी तुमचे कार्य हे आहे कि ज्या विरूध्द तुम्ही बंड करत आहात ते लिहा, काही तरी जे तुम्ही करू इच्छित नाही परंतू केले पाहिजे, काही तरी जे तुम्ही करू इच्छिता पण करू नये. ते गृहपाठ किंवा कार्य पूर्ण करणे, पालकांच्या इच्छिेनुसार वागणे इतके साधे असू शकते. तुमच्या मनाला, तुमच्या मित्रांना आणि कुटुंबाला किंवा तुमच्या भविष्याच्या आशा आणि देवाची सेवा करण्याच्या स्वप्नाला हया मूळे होणा-या नुकसानाबद्दल विचार करा.

**वाचा**

दिवस 1: यहोशवा 5:13-6:5
दिवस 2: यहोशवा 6:6-11
दिवस 3: यहोशवा 6:12-19
दिवस 4: यहोशवा 6:20-23
दिवस 5: यहोशवा 6:24-27

# 12. देवाची बाजू



**वीर: यहोशवा**

यहोशवा 1:1-11, 2:1-21, 3:14-4:7, 4:15-18, 5:10-6:11, 6:15, 6:20-25, इब्री 11:30-31

## पाठांतर वचन 12

योहान 1:12 “परंतु जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला.”

## आवश्यकता गोष्ट 12



किपची शाळा आता संपणार आहे. त्याच्या शेवटच्या परीक्षेची वेळ आली आहे, आणि त्याला माहित आहे कि त्याची शिष्यवृत्ती सुरु ठेवण्याकरिता त्याला परीक्षेत उत्तम गुण मिळविणे गरजेचे आहे. उद्या त्याची पहिली परीक्षा आहे, परंतु आज, दिवसभरा पासून तो त्याच्या मित्रांसोबत खेळत आहे आणि कार्टून पाहत आहे. दिवसाच्या शेवटी, जेव्हा तो झोपयला जातो, तेव्हा तो प्रार्थना करतो, "देवा, कृपा करून उद्याच्या परीक्षेत माझी मदत कर. मला माझी शिष्यवृत्ती सुरु ठेविण्याकरिता परीक्षेत उत्तम गुण मिळविण्याची गरज आहे. माझी प्रार्थना ऐकण्यासाठी धन्यवाद. मला माहित आहे कि तू माझी मदत करशील."

## मुख्य धडा 12

तुम्हाला आठवते का कि यहोशवा ने त्याचा विश्वास कसा वाढवला? देवाने यहोशवाला राष्ट्राचे नेतृत्व करण्यासाठी आणि त्यांना वचन दिलेल्या देशात नेण्यासाठी निवडले. 40 वर्ष भटकल्या नंतर, वचन दिलेले देश घेण्याची वेळ आली. यहोशवाने येरीहो नगरात दोन हेर पाठविले होते. राहाब नावाच्या एका महिले ने त्यांना तिच्या घरी लपविले आणि आणि मग खिडकीतून तिच्या घरातून बाहेर काढल, तिचे घर गावकुसाला लागून होते. त्यांनी तिला शपथ दिली कि जर तिने ज्या खिडकीतून त्यांना उतरविले त्या खिडकीला किरमिजी दोर बांधला तर ते तिला व तिच्या घराण्याला काहीही करणार नाही.

यार्देन नदी ओलांडण्यासाठी, याजाकांनी कराराचा कोश वाहिला, हा देव कुठे आहे ह्याचा प्रतिक होता, आणि ते सरळ नदीच्या मध्यभागी गेले. दुथडी वाहत असलेली नदी सांठून चढली. तुमच्या हातात पाण्याचे ढीग धरण्याचा प्रयत्न करत असल्याची कल्पना करा. इस्राएल लोकंकोरड्या जमिनीवर चालले आणि त्यांनी यार्देनेच्या मध्यभागातून 12 धोंडे उचलले यासाठी कि देवाने त्यांच्यासाठी जे काही केले होते त्याची त्यांना आठवण राहावी. आपल्या जीवनात देव काय करत आहे, हे आपण देखील लिहू शकतो. मग इस्राएल लोकांनी वल्हांडण सण साजरा केला: तुम्हाला आठवण आहे का जेव्हा त्यांनी त्यांच्या दारबह्यांना आणि चौकटीच्या कपाळपट्टीला कोकराचे रक्त लाविले?

एक दिवस यहोशवाने उपसलेली तलवार घेऊन उभा असलेला एक पुरुष पहिला. यहोशवाने त्याला विचारले कि तो इस्राएल च्या पक्षाचा होता कि त्यांच्या वैर्यांच्या पक्षाचा होता. तो पुरुष म्हणाला कि मी कोणाच्याही पक्षाचा नाही, मी येथे परमेश्वराचा सेनापती ह्या नात्याने आलो आहे. तो पुरुष येशू होता!

कधीकधी आपण असे मानतो कि देव आपल्या बाजूला आहे कारण आपण स्वतःला ख्रिस्ती म्हणतो किंवा चर्चला जातो. कधीकधी आपण चुकीच्या गोष्टी करतो, जसे कि परीक्षेसाठी अभ्यास न करणे किंवा पाप करणे, आणि मग आपल्याला जे पाहिजे त्यासाठी देवाकडे प्रार्थना करतो, आणि विचार करतो कि तो उत्तर का नाही देत आहे. परंतु आपण इतर बाजूंनी नव्हे, तर देवाच्या बाजूने राहावे. इस्राएल लोकांनी व्हलांडण सण साजरा केला आणि ते देवाच्या बाजूने सामील झाले, येशू वर विश्वास ठेवण्याचे एक चित्र. राहाब देवाच्या लोकांची मदत करून आणि तिच्या खिडकीला किरमिजी दोर बांधून देवाच्या बाजूने सामील झाली, येशू वर विश्वास ठेण्याचे आणखी एक चित्र. येशूच्या काळातील, इस्राएल लोकांचे अध्यात्मिक पुढारी, परुशींना असे वाटले कि ते परमेश्वराच्या बाजूने आहेत, परंतु त्यांनी येशू वर विश्वास न ठेऊन आणि इतर लोकांना देवापासून दूर करून परेमेश्वाराला राग आणला. येशूने त्यांना सांगितले कि जकातदार आणि कसबिणी विश्वास ठेऊन आणि पश्चताप करून त्यांच्या आधी देवाच्या राज्यात जातील (मत्तय 21:31-32). आपण आपल्या आई वडिलांच्या विश्वासावर किंवा चर्चला जाण्यावर आपले विश्वास टाकू शकत नाही, आणि ते कुठून आले आहेत याबद्दल आपण कोणाचा हि न्याय करू शकत नाही. तुम्ही कुठून आल आहात हे महत्वाचे नाही, तारण प्राप्त करण्यासाठी आपल्याला येशूवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे.

इस्राएल लोकांनी नगरासभोवती प्रदिक्षणा घातल्या आणि जयघोष केला. राहाबचे घर सोडून, बाकी संपूर्ण नगराचा तट जागच्या जागी कोसळला, आणि इस्राएल लोकांनी नगराला आग लावून जाडले. राहाब केवळ परमेश्वराच्या लोकांसोबत सामीलच नाही झाली, परंतु ती भविष्यातील राजा दावीद ह्याची मोठी आजी आणि येशूची great-great-many-more-great-आजी झाली  (मत्तय 1:5-6, 16). आणि यहोशवाने त्याच्या जीवनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत देशाचा पुढाकार केला.

मी ओळखतो कि केवळ ख्रिस्ती असल्याने देव माझ्या बाजूने आहे असे होणार नाही. मी देवावर विश्वास ठेऊन आणि त्याच्या अज्ञांचा पालन करून त्याच्या बाजूला सामील होणार.


## निर्णय 12



किपची परीक्षा खूप कठीण होती आणि, तो केवळ अभ्यास करूनच त्यात उत्तीर्ण होऊ शकत होता. त्याने परीक्षा पूर्ण केली आणि अशी अपेक्षा केली कि देव त्याला मदत करेल. काही दिवसांनी त्यांनी त्याला निकालपत्रक दिले आणि तो परीक्षेत अनुत्तीर्ण झाला कारण त्याने अभ्यास केला नव्हता. किपने त्याची शिष्यवृत्ती गमावली. मग त्याला खूप वाईट वाटले आणि त्याने फोन उचलला आणि त्याने त्याची मैत्रीण टॅफी हीला फोन केले यासाठी कि तिला त्याचाबद्दल अनुकंपा होईल

## कृती 12

**येरीहोचे तट**



मुलांना त्यांना देवापासून विभक्त करणाऱ्या गोष्टींबद्दल विचार आणि प्रार्थना करण्यासाठी काही वेळ द्या. प्रत्येक मुलाला येरीहोच्या भिंतीतील एक वीट असल्यासारखा कागदाचा एक तुकडा द्या. त्यांना त्यांच्या विटीवर असे काहीतरी लिहायला सांगा जे देवापासून दूर करते किंवा देवासोबत राहण्यात अडथळा आहे. त्यानंतर, मुलांना तो कागद घडी करून घरी न्यायला सांगा. त्यांना आठवडा भर त्या कागदाकडे पाहून देवाकडे प्रार्थना करण्यास प्रोत्साहित करा कि त्याने ती गोष्ट किंवा त्या भिंतीला त्यांच्यापासून वेगळे करावे आणि तिला त्यांच्या जीवनातून काढून फेकावे.


## काल रेखा 12

यहोशवा च्या जीवनाची कालरेखा काढा.


प्रश्न: जेव्हा यहोशवाचा जन्म झाला त्या वेळी मोशे किती वर्षांचा होता? उत्तर: आपल्याला त्याचे वास्तविक वाय माहित नाही. परंतु असा विचार केला जातो कि तो 40 वर्षांचा होता.

प्रश्न: यहोशवा किती वर्ष जगला? उत्तर: 110 वर्ष.

## कोडे उत्तर 12




| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| श्व | ती | हो | वा | वा | च | वि | ले |
| भिं | आ | श | बा | कु | री | ये | य |
| बा | हो | शी | जू | द्ध | टुं | ज | दे |
| य | प | जू | र्वा | द्ध | वि | ब | ब |
| कु | र | ड | हो | द | हा | ये | दू |
| टुं | मे | यु | ले | रा | जू | री | त |
| यु | श्व | दे | व | दू | त | हो | का |
| द्ध | र | वि | ज | त | यु | द्ध | ले |
| आ | शी | र्वा | टु | कु | टुं | ब | ब |



## प्रश्न उत्तर 12


1. तुम्ही देवाच्या इच्छे विरुद्ध असेलेली एखादी गोष्ट करण्यासाठी देवाची मदत कधी मागितली होती का? (विनोदी प्रर्थानांबद्दल बोला, जसे कि टीव्हीवरील कोणातरी साठी प्रार्थना करणे, काम न करण्यासाठी प्रार्थना करणे, दुसऱ्या मुलाने खेळ हारावा यासाठी प्रार्थना करणे, इत्य.).

2. देव खूप मोठा आहे; तो माझा सर्वात चांगला मित्र कसा होऊ शकतो? (देवाच्या विवध पैलूंची चर्चा करा, त्याची महानता, परंतु त्याच्या प्रेमाबद्दल ही. तसेच तो आपल्याला पूर्णपणे ओळखतो या विषयावर देखील चर्चा करा).

3. देवाला माझ्या कडून काय पाहिजे? (आपल्या सर्वांना देवाकडून वेगवेगळ्या भौतिक क्षमता आणि वेगवेगळे दान देण्यात आल्या आहे. देव या जगामध्ये त्याच्या नावाचा गौरव करण्यासाठी आणि त्याच्यासाठी इतर लोकांपर्यंत पोहचण्यासाठी आपल्या सर्वांचा एक ना एक मार्गाने वापर करून घेऊ शकतो. तुमच्याकडे कोणते दान आहेत? तुमच्यात कोणत्या क्षमता आहेत? लक्षात ठेवा कि, देव आपल्याला कोणतेही विशेष दान किंवा क्षमता नसतांना सुद्धा त्याच्या कार्यासाठी वापरू शकतो. कधीकधी तो आपल्या दुर्बालताद्वारे त्याची महानता दाखवू इच्छितो. तो अशा मनाबद्दल जास्त काळजी करतो जो त्याच्या कार्यासाठी उपलब्ध आहे आणि तो जे काही पण सांगेल ते सर्व करण्यास तयार असेल).

## खेळ 12

**हे काढा**



- पाठांतर वचनाचे पोस्टर तयार करा. अनेक शब्द न लिहिता, रिकामी पांढरी जागा सोडा.
- खेळण्यासाठी, मुले पवित्र शास्त्रात वचन शोधून ते वाचतील. आणि कोणते शब्द लिहिलेले नाही ते सांगतील.
- रिकाम्या जागांमध्ये, मुले न लिहिलेल्या शब्दांचे चित्र काढतील. (न लिहिलेले शब्द एका पेक्षा जास्त प्रकारे दर्शविले जाऊ शकतात).
- जर तुमचा गट मोठा आहे, तर त्याला 4 ते 6 लोकांच्या गटात विभागा आणि प्रत्येक गटासाठी poster ची एक प्रत तयार करा.
- सर्व चित्र काढून झाल्यावर, त्यांना वचन पाठ होई पर्यंत एकत्र ते सारखे सरके म्हणायला सांगा.

## हजेरी 12




वर्गात हजर राहण्यासाठी मुलांना त्यांचे आजचे कार्ड द्या. त्यांचे अभिनंदन कराआणि त्यांना दुसरे कार्ड घेण्यासाठी पुढील आठवड्यात येणास प्रोत्साहित करा जेणेकरून ते वीर खेळ खेळू शकतील! आजचे कार्ड आहे:

**यहोशवा**

## गृहपाठ 12

**कार्य**

या आठवड्यात तुम्हाला विचार कार्याचा आहे कि तुम्ही या गटाचा भाग असण्यासाठी ख्रिस्ती असल्याचा नाटक करत आहात कि तुम्ही खरोखर देवावर विश्वास ठेवता. जर हि तुमची पहिली वेळ आहे किंवा तुम्हाला अनिश्चितता वाटत असेल तर, तुही तुमच्या रविवार शाळेच्या शिक्षकाला विचारू शकता कि तुम्हीयेशू वर विश्वास ठेवून देवाच्या कुटुंबात कशा परकारे सामील होऊ शकता. जर तुम्ही आधीच येशूचा स्वीकार केलेला असेल, तर या आठवड्यात तुमच्या पेक्षा वेगळ्या कोणालातरी काहीतरी चांगले बोला, जसे कि त्यांच्या कपड्यांचेकौतुक करणे किंवा ते कशा प्रकारे खेळ खेळतात त्याचे कौतुक करणे.

**वाचा**

दिवस 1: यहोशवा 7:1-12

दिवस 2: यहोशवा 7:13-19

दिवस 3: यहोशवा 7:20-26

दिवस 4: यहोशवा 8:1-13

दिवस 5: यहोशवा 8:14-29

# 13. काहीही ठेऊ नका



**पवित्र शास्त्रातील गोष्ट:आखान**

यहोशवा 6:17-19, 7:1-12, 7:20-8:7, 8:18-27

## पाठांतर वचन 13

1 योहानाचे 1:9 ""जर आपण आपली पापे पदरी घेतली, तर तो विश्वसनीय व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अनीतीपासून शुद्ध करील."

## आवश्यकता गोष्ट 13



कौमेट त्याच्या वर्गात शिक्षकाच्या मागण्या आधीच त्याचे विज्ञानाचे काम पूर्ण करीत होता. त्याला सर्वात उत्तम अंक मिळवायचे होते. त्याच वेळी, एक मित्र धावत आत आला आणि तो अडखळून कौमेटच्या कामावर आदडला आणि ते खाली पडले. ते जमिनीवर पडताच पूर्णपणे नष्ट झाले आणि त्याच्याकडे त्याच्या शिक्षकाला देण्यास काहीही उरले नव्हते. कौमेटला खूप राग आला, परंतु त्या मुलाने सर्व वर्गमित्र आणि शिक्षका समोर त्याची क्षमा मागितली. मग कौमेट काहीही करू शकला नाही. त्याला हे म्हणण्या शिवाय दुसरा पर्याय नव्हता, "तू क्षमा मागितली, म्हणून मी तुझी क्षमा करतो." परंतु त्याने त्याला मनापासून क्षमा केली नव्हती. त्याने विचार केला, "येणाऱ्या काही दिवसात, मी देखील याच्या सोबत असेच करणार, आणि मग त्याला समजेल कि एखादी महत्वपूर्ण गोष्ट हरवणे कसे वाटते." त्यानंतर, कौमेटने शिक्षकाने एक मोठे आणि महत्वपूर्ण काम देण्याची वाट पाहिली. एका दिवशी त्यांचा शिक्षकाने असेच एक काम त्यांना दिले. कौमेट म्हणाला, "हीच माझी संधी आहे!" ते शाळेत नेण्याची वेळ आली तेव्हा, कौमेट दुकानात सोडा घेण्यास गेला. त्याचा हेतू हा होता कि तो "चुकीने" तो सोडा त्या मुलाच्या कामावर वाहून देणार.

## मुख्य धडा 13

मागच्या आठवड्यात, यहोशवा आणि इस्राएल लोकांनी येरीहोचा पाडाव केला. देवाने त्यांना सांगितले कि त्या पहिल्या नगरात सर्वकाही त्याचे होते, आणि त्यांना सर्वकाही आग लाऊन जाळून टाकायचे होते आणि स्वतःसाठी काहीहो ठेवायचे नव्हते. उर्वरित नगरातील लुटलेली मालमत्ता हि इस्राएल लोकांसाठी होती. आपल्या जीवनात, सर्व गोष्टींचा पहिला भाग है देवाचा आहे, आणि आपल्याला तो देवाला देणे आहे.

यहोशवा आणि इस्राएल लोकांना वाटले कि आय नगराचा पाडाव करणे सोपे असणार. इस्राएल लोकांनी या आधी जिंकलेल्या युद्धांपेक्षा हे युद्ध लहान होते. आपल्याला पापांवर विजय मिळविण्यासाठी आणि चागंल्या गोष्टी करण्यासाठी, जसे कि आपल्या आई वडिलांसोबत प्रेमाने वागणे, देव आपल्याला आपल्यामध्ये पवित्र आत्मा देतो. देवाच्या मदतीने, ते अधिक सोपे वाटू शकते. इस्राएल लोकांनी या नगरात फार कमी लोकं पाठविले होते, परंतु यावेळी अगदी सहजपणे त्यांचा पराभव करण्यात आला! यहोशवा देवाकडे रडत म्हणाला, "तू आमच्याबरोबर आता का नाहीस? या देशातील सर्व लोक आम्हाला मारून टाकतील, आणि तू थोर देव आहेस असा विचार कोणीच करणार

नाही” देवाने त्याला म्हटले उठ, आणि त्याने त्याला सांगितले कि त्यांचा पराभव यासाठी झाला होता कारण कि इस्त्राएल लोकांमधून कोणीतरी लुटलेल्या वस्तूंमधून काही वस्तू घेतलेल्या होत्या. समजा एक दिवस तुम्ही तुमच्या आओ वडिलांशी खोटे बोलत. तुम्ही तुमचे आई वडील, तुमचे शिक्षक किंवा मित्र या सर्वांकडून काहीतरी लपविण्यास सक्षम असाल, परंतु तुम्ही देवाकडून काहीही लपवू शकणार नाही, देव सर्वकाही पाहतो आणि त्याला सर्व काही माहित आहे. काही दिवसांनी तुम्हाला हे जाणवते कि तुमच्यासाठी तुमच्या आई वडिलांसोबत चांगले राहणे खूप कठीण होत आहे, आणि म्हणून तुम्ही रडत रडत देवाला विचारता कि, तो तुमच्या बरोबर का नाही आहे. त्याऐवजी, यहोशवाने जे केले ते करा आणि देवाला विचारा कि मी काही चुकीचे केले आहे का. जेव्हा तुम्ही असे कराल, तेव्हा देव तुम्हाला मदत करेल कारण तो तुमच्यावर प्रेम करतो आणि त्याला तुमच्यासाठी सर्वात उत्कृष्ट ते करण्याची इच्छा आहे. ज्याप्रमाणे, देवाला इतर राष्ट्रांपेक्षा इस्त्राएल लोकं काय करतात याची अधिक काळजी होती, त्याच प्रकारे एक परिपूर्ण विजय दिसण्यापेक्षा अधिक तो तुमच्या मनाविषयी जास्त काळजी करतो. पवित्र शास्त्र म्हणते कि, जर आपण आपली पापे पदरी घेतली, तर तो विश्वसनीय व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करेल. जेव्हा देव तुम्हाला दाखवतो कि तुम्ही चूक केली आहे, तेव्हा परत जा आणि ती लवकरात लवकर ठीक करा. जर तुम्ही तुमच्या आई वडिलांशी खोटे बोलले आहात, तर त्यांना सत्य सांगा. जर तुम्ही काही चोरले आहे, तर ते परत करा. जर तुम्ही कोणाशी वाईट वागले आहात, तर त्यांची क्षमा मागा. जर तुम्ही कौमेट सारखे मनात राग धरून बसला आहात, तर त्या व्यक्तीला क्षमा करा आणि त्याच्याकडून बदला घेण्याचा विचार तुमच्या मनातून काढून टाका. जर तुम्ही देवाच्या मालकीची एखादी गोष्ट घेतली असेल, तर ती परत करा. तुम्ही जितक्या लवकर पश्चताप कराल, देव तुम्हाला तितक्या लवकर पुढे जाऊन विजय मिळवून देण्यात मदत करेल.

देवाने इस्त्राएल लोकांना दाखवले कि आखान नावाच्या एका मनुष्याने पाप केले होते. त्यांना येरीहोतील त्याच्या डेर्यात एक झगा, काही शेकेल रूपे आणि सोन्याची एक वीट सापडली. त्यांनी त्याला आणि त्याच्या वस्तूंना नेले आणि ते वस्तू नष्ट केले. मग, जेव्हा, ते पुन्हा आय नगराचा पाडाव करण्यास गेले, तेव्हा देवाने त्यांना विजयी केले.

मी निश्चय करतो कि मी देवापासून कोणतीही गोष्ट लपविणार नाही आणि माझ्या कडून झालेल्या चुकांसाठी मी पश्चताप करणार.

## निर्णय 13



परंतु जेव्हा तो या संधीची वात पाहत होता, तेव्हा टेफ्फीला तो काय करणार आहे हे कळले. मग टॅफीने त्याला सांगितले कि त्याच्या मनात राग धरून ठेवणे आणि क्षमा न करणे, बरोबर नाही आहे. देवाला या गोष्टी आवडत नाही. कौमेटला समजले कि तो चुकत आहे. त्यांनी देवाकडे प्रार्थना केली आणि त्याने खरोखर त्याच्या मित्राला क्षमा केली.

## कृती 13

**हे माझे नाही**



मुलांना टेबलच्या मध्यभागी एक वैयक्तिक वस्तू ठेवण्यास सांगा. त्यातली एक वस्तू घ्या आणि एखाद्याला विचारा, "हे तुझे आहे काय?" जर ते त्याचे नसेल तर, त्या मुलाने म्हणावे, "हे माझे नाही आहे आणि मी लोभ करणार नाही आणि जे माझे नाही आहे ते मी नाही घेणार." प्रत्येक

वस्तूसह असे करा, यासाठी कि प्रत्येकजण यात सामील होईल. जर मुले लहान असतील तर तुमचे उत्तर सोपे करा, "हे माझे नाही आहे."

## काल रेखा 13

ज्या वेळेस आखानाच्या अवज्ञाची गोष्ट झाली त्या वेळेला चिन्हांकित करा.

प्रश्न: ज्या वेळेस त्याने आयवर विजय मिळविली त्या वेळेस यहोशवा किती वर्षांचा होता? उत्तर: आपल्याकडे त्याचे वास्तविक वाय नाही आहे, परंतु असा विचार केल्या जातो कि यहोशवा 70 वर्षांचा होता.

प्रश्न: आखानाने देवाची अवज्ञा केव्हा केली? उत्तर: ज्या वेळी यहोशवा आणि इस्त्राएल लोकं येरीहोचा पाडाव करण्यासाठी लढत होते.

## कोडे उत्तर 13

| 1 | 5 | 7 | 0 | 8 |
|---|---|---|---|---|
| 40 | 25 | 10 | 52 | 27 |

| 4 | 6 | 2 | 9 | . |
|---|---|---|---|---|
| 19 | 21 | 17 | 30 | 39 |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5 | 0 | 4 | 9 | 0 | 8 | 0 | . | 2 | 1 | 4 | 8 | 0 |
| 0 | 1 | 5 | 6 | 1 | 6 | 9 | 4 | 1 | 0 | . | 0 | 6 | 1 |
| 6 | 9 | 1 | 0 | 9 | 7 | 1 | 0 | . | 5 | 8 | 1 | 5 | 8 |
| 0 | 6 | 9 | 2 | 5 | 0 | 8 | 5 | 0 | 6 | 0 | 7 | 4 | 2 |
| 7 | 1 | 0 | 6 | 1 | . | 9 | . | 2 | 1 | 9 | 0 | 9 | 1 |
| 8 | . | 4 | 0 | 8 | 0 | 1 | 5 | 0 | 4 | 8 | 1 | 5 | 6 |
| 4 | 0 | 9 | 7 | . | 4 | . | 9 | 8 | 5 | 6 | 2 | 5 | 0 |
| 1 | 2 | 1 | 4 | 1 | 5 | 0 | 1 | 5 | 6 | 1 | 0 | . | 8 |
| 4 | 8 | 4 | 8 | 6 | 0 | 2 | 5 | 9 | 1 | 9 | 2 | 5 | 1 |
| 8 | 5 | 0 | 9 | 8 | 1 | 8 | 7 | 0 | . | 8 | 1 | 6 | 8 |
| 1 | 9 | 1 | 0 | . | 4 | . | 2 | . | 5 | 9 | . | 0 | 9 |
| 6 | 0 | . | 4 | 1 | 0 | 1 | 0 | 1 | . | 1 | 0 | . | 0 |
| 0 | 8 | 5 | 6 | 0 | 8 | 5 | . | 0 | 9 | 0 | . | 5 | 6 |
| 1 | . | 1 | 0 | 1 | . | 6 | 1 | . | 5 | 1 | 2 | 4 | 8 |
| 9 | 6 | 9 | . | 9 | 7 | 8 | 0 | . | 4 | . | 0 | 9 | . |
| 2 | 0 | 8 | 0 | . | 4 | 9 | 8 | 2 | 8 | 0 | . | 6 | 0 |
| 7 | 2 | 1 | . | 5 | 0 | 1 | . | 7 | 9 | 1 | 9 | 7 | . |
| . | 4 | . | 0 | 2 | 4 | 6 | 0 | . | 4 | 6 | 2 | 0 | 8 |
| 9 | 5 | 9 | 9 | 0 | . | 7 | 9 | 1 | . | 0 | 5 | . | 9 |
| 0 | 2 | 8 | 5 | 9 | 5 | . | 8 | 6 | 0 | 2 | . | 0 | 1 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| लु | ट | णे | आ | उ | प |
| प | कु | टुं | ब | ते | र |
| रा | र | पा | प | जि | मे |
| भ | ते | मे | आ | त | श्ध |
| व | दे | ले | श्ध | क | रा |
| उ | व | आ | यु | र | भ |
| ठे | द्ध | य | खा | णे | व |
| श्ध | ज | टुं | कु | न | ठे |
| वि | आ | नं | द | द्ध | ले |
| रा | ग | भ | यु | उ | जि |



## प्रश्न आणि उत्तर 13


1. भूतकाळात कोणत्या गोष्टी लपविलेल्या आहेत ज्यांच्या बद्दल देवाला माहित आहे? (त्यांना बोलण्यासाठी वेळ द्या आणि त्यांना आठवण करून द्या कि जर एखाद्याने तुमच्यावर विश्वास ठेऊन काही सांगितले आहे तर ते पुन्हा नाही केले पाहिजे).

2. देव दुसरी संधी देतो काय? (नक्कीच, परंतु आपल्याला जेव्हा एखादी गोष्ट करावयाची असते, तेव्हा आपण दुसरी संधी मिळविण्यासाठी आपल्या आई वडिलांसोबत खोटे बोलण्याचे प्रयत्न करणाऱ्या पद्धतींविषयी विचार करा).

3. हे माझे जीवन, माझा वेळ आणि माझे पैसे आहे, बरोबर? (जेव्हा तुम्ही ख्रिस्ती असल्याच्या एका नवीन स्तरावर जाल, आणि तुमच्या जवळ असलेले सर्वकाही परमेश्वराला द्याल, तेव्हा तुम्हाला दिसणार कि तुमच्या वस्तू वास्तविक तुमच्या नाहीत).

## खेळ 13

**संगीत पास**



- प्रत्येक विद्यार्थ्याला एक पवित्र शास्त्रातील वचनाचा एक पत्र लिहिलेले एक कार्ड द्या आणि त्यांना एका गोलाकारात बसवा. पवित्र शास्त्रातील वाचनाचे शब्द क्रमात नाहीत याची खात्री करा.
- संगीत वाजल्यावर, मुले त्यांचे कार्ड एकमेकांना देतात.
- जेव्हा संगीत बंद होणार, तेव्हा मुले त्यांच्या हातातील कार्ड क्रमात वाचतील.
- अनेक फेर खेळल्यावर, मुले त्यांचे कार्ड घेऊन समोर येतील आणि वचनाच्या क्रमात त्यांना ठेवतील.
- एकत्र ते वचन वारंवार म्हणा.

## हजेरी 13

वर्गात हजर राहण्यासाठी मुलांना त्यांचे आजचे कार्ड द्या. त्यांचे अभिनंदन कराआणि त्यांना दुसरे कार्ड घेण्यासाठी पुढील आठवड्यात येणास प्रोत्साहित करा जेणेकरून ते वीर खेळ खेळू शकतील! आजचे कार्ड आहे:
**लपवलेले सोने**




## गृहपाठ 13

**कार्य**

या आठवड्यात तुमचे कार्य असे आहे कि तुम्ही देवापासून आणि इतरांपासून काय लपवत आहात त्याबद्दल लिहावे आणि तुम्ही ते का लपवत आहात हे देखील लिहावे. मग विचार करा कि ती गोष्ट तुम्हच्या कशा प्रकारे परिणाम करीत आहे. ती देवासोबत तुम्हचे सहभाग खराब करते, आणि हे चांगले नाही. परंतु, आयमध्ये घडल्या प्रमाणे, आपल्या वर्गातील लोकांना आणि आपण ज्या लोकांबरोबर येशूचे अनुसरण करीत आहोत त्या लोकांना देखील त्या गोष्टीचा त्रास होतो. काही कारणास्तव त्यांना हे कळणार नाही, कि ते तितके प्रभावी नाही, तितके आनंदी नाही, किंवा एक गट म्हणून ते जितके अनुकूल असले पाहिजे तितके राहिलेले नाही. काय करायचे आहे हे तुम्हाला माहित आहे. तुमच्या आई वडिलांकडे किंवा एखाद्या विश्वासु शिक्षक किंवा पाडकाकडे किंवा येशू कडे त्या पापाची कबूली करा.  देवाची क्षमा माग आणि त्याच्या क्षमेमुळे जो बदल घडतो तो पाहा.

**वाचा**

या आठवड्यात वाचण गृहपाठ नाही आहे.